❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | रविवार, दि. ०६ सप्टेंबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २५२ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रुपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्षे
निर्भीड पत्रकारितेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक






## थोडक्यात...



### मराठा आरक्षणाबाबत सरकार सकारात्मक

मुंबई : दैनिक संध्या

सध्या राज्यात मराठा आरक्षणाच्या मुद्यावरुन चांगलच वातावरण तापल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे गेल्या आठ दिवसापासून उपोषणाला बसले आहेत. अद्यापही याबाबत कोणताही तोडगा निघालेला नाही. दरम्यान, या आंदोलनाच्या संदर्भात मंत्री गुलाबराव पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ओबीसींच्या हक्कावर गदा आली तर, ओबीसी देखील शांत बसणार नाही. आपल्या हक्काचं घ्यावं, कुणाच्या ताटातलं घेऊ नये अशी ओबीसींची भूमिका असल्याचं मत मंत्री गुलाबराव पाटील यांनी व्यक्त केले. मराठा आरक्षणाबाबत सरकार देखील सकारात्मक आहे. आगामी काळात सण उत्सव असल्याने शांततेच्या मार्गाने सरकारकडे मागणी करावी असेही मंत्री गुलाबराव पाटील म्हणाले. एमपीएससी परीक्षा पेपर फूट हा विद्यार्थ्यांच्या करिअरचा प्रश्न आहे. त्यात उद्या मी जरी दोषी असेल तर कारवाई व्हायला पाहिजे असे पाटील म्हणाले. संजय राऊत यांच्यावर किती प्रयोग झाले ते मला तपासावे लागतील. कारागृहातून बाहेर आल्यानंतर ते वेगवेगळे प्रयोग झाल्याचे सांगतात असा टोला गुलाबराव पाटलांनी लगावला. ओबीसींच्या हक्कावर गदा आली तर ओबीसी देखील शांत बसणार नाही, आपल्या हक्काचं घ्यावं कुणाच्या ताटातलं घेऊ नये असे वक्तव्य मंत्री गुलाबराव पाटील यांनी केले आहे. मराठा आरक्षणाबाबत विचारलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते.

### NIA कोर्टाने १० आरोपींना ठरवलं दोषी

मुंबई : दैनिक संध्या

२०१३ मधील बहुचर्चित झीरम घाटी नक्षलवादी हल्ल्याप्रकरणी जगदलपूर येथील राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या विशेष न्यायालयाने अत्यंत महत्त्वाचा निकाल देत १० आरोपींना दोषी ठरवले आहे. तब्बल १३ वर्षांनंतर आलेल्या या ऐतिहासिक निकालात न्यायालयाने आरोपींना दोषी ठरवले आहे. अद्याप शिक्षेची घोषणा मात्र केलेली नाही. विशेष न्यायालयाने १०१ साक्षीदारांचे जबाब घेत उपलब्ध पुराव्यांच्या आधारे हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. दोषींच्या शिक्षेची सुनावणी आणि कालावधी निश्चित करण्यासाठी १६ सप्टेंबर ही तारीख निश्चित करण्यात आली आहे. या निकालावर प्रतिक्रिया देताना छत्तीसगडचे माजी उपमुख्यमंत्री टी. एस. सिंह देव यांनी असंतोष व्यक्त केला आहे.

### दहीहंडीचा जल्लोष

मुंबई : दैनिक संध्या

राज्यभरात दहीहंडी उत्सव अत्यंत उत्साहात आणि मोठ्या जल्लोषात साजरा केला जात आहे. यंदा विविध दहीहंडी आयोजक आणि मंडळांकडून निष्णात गोविंदा पथकांसाठी लाखो रुपयांची आकर्षक बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत. याशिवाय, अनेक नामांकित हंड्यांच्या ठिकाणी मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय कलाकारांची खास उपस्थिती हे यंदाच्या उत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. 2009 सालच्या अशाच एका दुर्घटनेत थरावरून कोसळल्यामुळे नागेश भोईर हा गोविंदा गंभीर जखमी झाला होता आणि तेव्हापासून तो अंथरुणाला खिळून आहे. यंदाच्या उत्सवातही काही गोविंदा जखमी झाल्याच्या घटना ताज्या असतानाच, मंत्री प्रताप सरनाईक यांनी एक दिलासादायक निर्णय घेत गेल्या अनेक वर्षांपासून अंथरुणात खितपत पडलेल्या नागेश भोईरच्या पुढील उपचारांचा संपूर्ण खर्च उचलण्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली आहे.

### माध्यमांनी विश्वासार्हता प्रस्थापित करावी : गडकरी

नागपूर : दैनिक संध्या

माध्यम क्षेत्रासमोर सध्या विश्वासार्हतेचे संकट ही सर्वात मोठी समस्या असल्याचे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले. माध्यमांनी आपली विश्वासार्हता पुन्हा प्रस्थापित करण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'ग्लोबल इम्पॅक्ट फोरम २०२६' चे उद्घाटन

## आर्थिक संबंधांपलीकडे मानवी मूल्ये, सांस्कृतिक वारसा आणि परस्पर संवाद आवश्यक – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### सामायिक मूल्ये, संस्कृती आणि संवादातून जग अधिक चांगले बनविण्याची गरज

■ मुंबई (दै. संध्या)

जगातील विविध देशांच्या संस्कृती, परंपरा, विचारसरणी आणि जीवनपद्धती वेगवेगळ्या असल्या, तरी मानवतेला जोडणारी काही सार्वत्रिक मूल्ये समान आहेत. या मूल्यांचा शोध घेत, सांस्कृतिक देवाणघेवाण, परस्पर सन्मान आणि संवादाची व्याप्ती वाढविणे आजची गरज आहे. केवळ आर्थिक सहकार्य नव्हे, तर मानवी मूल्ये, सांस्कृतिक वारसा आणि परस्पर संवादातूनच अधिक समतोल, शांततामय आणि समृद्ध जगाची निर्मिती शक्य आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.



'ग्लोबल इम्पॅक्ट फोरम २०२६' (GIF) च्या दुसऱ्या पर्वाच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी मुंबई येथील ब्राझीलचे महावाणिज्यदूत जोसे मौरो फोनेस्का कोस्टा कौटो, रशियाचे महावाणिज्यदूत इव्हान फेतिसोव्ह, चीनचे महावाणिज्यदूत किन ती, दक्षिण आफ्रिकेचे महावाणिज्यदूत गेडियन लाबाने यांच्यासह भारत, ब्राझील, रशिया, चीन आणि दक्षिण आफ्रिका या ब्रिक्स देशातील राजनैतिक प्रतिनिधी, उद्योगपती, अभ्यासक व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या शुभेच्छा देताना त्यांनी भगवान श्रीकृष्णांच्या सर्वसमावेशकता, धर्मनिष्ठा आणि सत्याच्या विजयाच्या संदेशाचा उल्लेख केला.

मुख्यमंत्री म्हणाले की, सध्याच्या काळात जग अनेक स्तरांवर विखुरलेले असून जागतिक व्यवस्था विविध अर्थांनी असंतुलित झाल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत विविध देशांनी एकत्र येण्यासाठी उपलब्ध असलेल्या संधींचा शोध घेण्याची हीच योग्य वेळ आहे. संस्कृती ,मते आणि विचारधारा भिन्न असल्या तरी संवादाच्या माध्यमातून समान मूल्यांवर आधारित परस्पर समज वाढविणे शक्य आहे. केवळ आर्थिक संबंध आणि व्यापाराच्या माध्यमातून जग अधिक चांगले होऊ शकत नाही. त्यासाठी मानवी मूल्यांवर आधारित संवाद, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि परस्परांच्या अनुभवांतून शिकण्याची प्रक्रिया आवश्यक आहे. विविध देशांतील नागरिक, राजकीय नेते, राजनैतिक प्रतिनिधी, विचारवंत तसेच उद्योग व व्यावसायिक क्षेत्रातील नेतृत्वाने अशा व्यासपीठांवर एकत्र येऊन विचारांचे आदान-प्रदान करणे महत्त्वाचे आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

भारत हा जगातील प्राचीन संस्कृतींपैकी एक असून भारतीय संस्कृतीच्या मूलभूत विचारांचा पाया 'वसुधैव कुटुंबकम्' या संकल्पनेत आहे. संपूर्ण विश्व एक असून संपूर्ण जग हे एक कुटुंब आहे, ही भारतीय जीवनदृष्टी आहे. भारताने आपल्या इतिहासात केवळ वस्तू आणि व्यापाराचा प्रसार केला नाही, तर विचार, ज्ञान आणि जीवनमूल्यांचाही जगभर प्रसार केला आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले. भारताचा जागतिक व्यापारातील ऐतिहासिक सहभाग महत्त्वपूर्ण राहिला असून व्यापाराबरोबरच भारतीय विचारांचा आणि जीवनमूल्यांचा विविध देशांवर प्रभाव पडलेला आहे. बौद्ध धर्म हे याचे महत्त्वपूर्ण उदाहरण आहे. भारतातून अनेक शतकांपूर्वी जगाच्या विविध भागांत पोहोचलेल्या या विचारधारेने मोठा प्रभाव निर्माण केला आहे. विशेष म्हणजे हा विचारांचा प्रसार युद्ध, संघर्ष किंवा हिंसेच्या माध्यमातून नव्हे, तर विचार आणि मूल्यांच्या प्रभावातून झालेला आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी संचालक जान्हवी पवार यांनी ग्लोबल इम्पॅक्ट फोरमच्या व्यापक उद्दिष्टांची माहिती दिली. सांस्कृतिक समानता आणि परस्पर सहकार्याच्या माध्यमातून ब्रिक्स राष्ट्रांमध्ये नव्या भागीदारीच्या संधी निर्माण करण्याबरोबरच जागतिक स्तरावर सकारात्मक आणि दीर्घकालीन परिणाम साध्य करण्यासाठी हा मंच महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### भारत-ब्राझील सांस्कृतिक संबंधांचे दृकश्राव्य सादरीकरण

इतिहास आणि लोकजीवनाच्या समृद्ध परंपरेत संगीत, नृत्य, क्रीडा आणि उत्सव हे ओळख व सांस्कृतिक अभिव्यक्तीची प्रभावी माध्यमे ठरले आहेत. भारत आणि ब्राझील या दोन्ही देशांच्या सांस्कृतिक परंपरांमध्ये असलेल्या साम्यस्थळांचे आणि दृढ भागीदारीचे दर्शन घडविणारे दृकश्राव्य सादरीकरण यावेळी उपस्थितांना दाखविण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रभावी आयोजनाबद्दल मुख्यमंत्र्यांनी जान्हवी पवार आणि एपी ग्लोबल इम्पॅक्ट फोरम यांचे अभिनंदन केले. यावेळी विविध देशांचे राजदूत, उद्योग क्षेत्रातील वरिष्ठ प्रतिनिधी, अभ्यासक, समुदायाचे प्रतिनिधी, राजकीय नेते, विचारवंत तसेच उद्योग व व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# मुंबईत दहीहंडी उत्सवात मन हेलावणारी घटना; विटांचा कॉलम कोसळला

### ७ वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात दहीहंडी उत्सावाची धूम पाहायला मिळत असून पारंपरीक पद्धतीने ढोला-ताशांच्या वाद्यात आणि गोविंदांच्या उत्साहात जल्लोष पाहायला मिळत आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबई, वसई विरारसह अनेक भागात सेलिब्रिटींसह जंगी दहीहंडी उत्सव दिसून येतो. दहीहंडी उत्सव पाहायला नागरिकांनी गर्दी केली असून गोविंदांचे थरावर थर चढत आहेत. 9 ते 10 थरांची सलामी काही ठिकाणी गोविंदांकडून देण्यात आली आहे. मात्र, मालाडच्या मालवणी रोडवरील एकता वेल्फेअर सोसायटीत ही मन हेलावणारी घटना घडली. मालवणी येथे दहीहंडीच्या कार्यक्रमादरम्यान भिंतीचा कॉलम कोसळून 7 वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. मालाड पश्चिमेकडील मालवणी परिसरात दहीहंडी फोडताना विटांचा कॉलम कोसळून 7 वर्षीय मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची दुर्घटना आज शनिवारी दुपारी 3 वाजताच्या सुमारास घडली. मिळालेल्या माहितीनुसार, चिकुवाडी, मालवणी, मार्वे रोड येथील एकता वेल्फेअर सोसायटीतील रूम क्रमांक



23 जवळ स्थानिक पातळीवर दहीहंडीचा उत्सव सुरू होता. काही मुले स्वतःहून दहीहंडी फोडत होती, यासाठी दोरी एका झाडाला तसेच तळमजल्यावरील बांधकामाच्या विटांच्या कॉलमला बांधण्यात आली होती. दहीहंडी फोडण्याच्या प्रयत्नादरम्यान अचानक विटांचा कॉलम कोसळला आणि त्याखाली 7 वर्षीय रुद्र कदम हा मुलगा अडकला. या दुर्घटनेत त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. या घटनेनंतर रुद्रला तातडीने मालवणी जनरल हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी नेण्यात आले. मात्र, रुग्णालयातील माहितीनुसार डॉक्टरांनी रुद्रला दाखल करण्यापूर्वीच मृत घोषित केले.

# लेझर अन् कानठळ्या बसवणारा दणदणाट रोखणार!

## नागपूर पोलिस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांचे गणेश मंडळांना आवाहन

■ नागपूर (दै. संध्या)

नागपूर शहरात सण-उत्सवांच्या काळात डीजे, अतिप्रखर लेझर लाईट्स आणि ध्वनिप्रदूषणावर घालण्यात आलेल्या निर्बंधांविषयी निर्माण झालेला संभ्रम दूर करत नागपूरचे पोलिस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी पत्रकार परिषदेत सविस्तर भूमिका मांडली. "पोलिस प्रशासनाचा पारंपरिक संगीताला, ढोल-ताशाला किंवा उत्सवाच्या उत्साहाला कोणताही विरोध नाही. मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचना आणि पर्यावरण संरक्षण कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या अतिप्रखर लेझर बीम्स व बेसुमार ध्वनिप्रदूषणावर कडक कारवाई केली जाईल," असे त्यांनी ठामपणे स्पष्ट केले. उत्सवाच्या काळात होणाऱ्या गंभीर उल्लंघनांवर बोलताना नांगरे पाटील यांनी कायदेशीर बाबींकडे लक्ष वेधले. सामान्यतः अशा प्रकरणांत मुंबई पोलीस कायद्यान्वये किरकोळ कारवाई होते. मात्र, अमर्याद आवाजाची भिंत उभारणे हा पर्यावरण संरक्षण कायद्यानुसार गंभीर गुन्हा ठरतो. या कायद्यांतर्गत दोषी आढळल्यास 5 वर्षांपर्यंत कारावास आणि 1 लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद असून सर्वोच्च न्यायालयानेही याबाबत कठोर मार्गदर्शक तत्त्वे जारी केलेली आहेत. नांगरे पाटील यांनी आपल्या प्रशासकीय



कारकिर्दीतील अनुभवाचा दाखला देत सांगितले. कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक (IGP) असताना त्यांनी सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर व पुणे ग्रामीण या पाच जिल्ह्यांत तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून अशीच नियमावली लागू केली होती. त्यावेळी 144 हून अधिक पोलिस ठाण्यांच्या हद्दीत गणेश मंडळांनी पोलिसांना अत्यंत सकारात्मक व रचनात्मक पाठिंबा दिला होता. तोच पॅटर्न आता नागपूरमध्ये राबवण्यात येत असून सर्व गणेश मंडळांना, कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन बैठका घेतल्या जात आहेत.

उत्सवाच्या मूळ परंपरेची आठवण करून देताना ते म्हणाले, 1893 मध्ये लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला, त्याचा मूळ हेतू लोकशिक्षण, प्रबोधन आणि पारतंत्र्यातील मरगळलेल्या मनांमध्ये नवी ऊर्जा फुंकणे हा होता.

### रेव्ह पार्ट्या, व्यसनांची जोड

मिरवणुकांमध्ये वापरल्या जाणाऱ्या लेझर लाईट्स आणि हाय-बेस साऊंड सिस्टीमच्या धोक्यांवर त्यांनी सखोल तांत्रिक माहिती दिली. "मी माझ्या सेवाकाळात तीन मोठ्या रेव्ह पार्ट्यांवर स्वतः छापे टाकलेले आहेत. या पार्ट्यांमध्ये जो 'रॅडिकल ऑडिओ-व्हिज्युअल' अनुभव असतो, तोच आजकाल सार्वजनिक मिरवणुकांमध्ये लेझर आणि ट्रान्स-म्युझिकच्या माध्यमातून आणला जात आहे." प्रखर लेझर बीम आणि प्रचंड बेस यामुळे मज्जासंस्थेवर परिणाम होऊन हेलुसिनेशन (भास) निर्माण होतात. अशा प्रकारच्या तीव्र लेझर लाईट्स आणि ट्रान्स म्युझिकचा वापर अमली पदार्थांच्या व्यसनांकडे ओढणाऱ्या मानसिकतेला पूरक ठरतो. त्यामुळे अशा घातक तंत्रज्ञानाला आळा घालणे आवश्यक आहे.

# भुजबळांनी रस्त्यावर उतरावं : विजय वडेट्टीवार

## *सरकारवर हल्लाबोल, दादा भुसेंवर म्हणाले- शिक्षणमंत्र्यांचे अधिकार काढले, मग मंत्री का ठेवता?*

■ नागपूर(दै. संध्या)

राज्यातील ओबीसी समाजाच्या प्रश्नांवरून काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी महायुती सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. ओबीसी आरक्षण, विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सुविधा, शिष्यवृत्ती आणि स्वाधार योजनेच्या थकीत रकमा यांचा मुद्दा उपस्थित करत त्यांनी मंत्री छगन भुजबळ यांनी आता केवळ सरकारमध्ये राहून भूमिका मांडण्याऐवजी ओबीसींच्या हक्कांसाठी रस्त्यावर उतरावे, असे आवाहन केले. "मंत्रिमंडळात राहून तुमच्या डोळ्यादेखत ओबीसींचे वाटोळे होत असेल, तर ओबीसी समाज तुम्हाला माफ करणार नाही," असा इशाराही वडेट्टीवार यांनी दिला.

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नासोबतच शैक्षणिक आणि सामाजिक सवलतींबाबतही सरकार गंभीर नसल्याचा आरोप त्यांनी केला. दरम्यान, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या काही अधिकारांमध्ये करण्यात आलेल्या बदलावरही वडेट्टीवार यांनी प्रश्न उपस्थित करत हा निर्णय त्यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा असल्याचे म्हटले.

ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नावर सरकारने घेतलेल्या निर्णयांमुळे समाजाचे मोठे नुकसान होत असल्याचा दावा वडेट्टीवार यांनी केला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ओबीसींच्या राजकीय प्रतिनिधित्वावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.



"आमच्यावर अन्याय झाला तर आम्ही रस्त्यावर उतरू," अशी भूमिका यापूर्वी घेतली जात होती. आता प्रत्यक्षात रस्त्यावर उतरण्याची वेळ आली आहे, असे सांगत वडेट्टीवार यांनी छगन भुजबळ यांना लक्ष्य केले.

"भुजबळ साहेब अनेक वर्षे ओबीसींचे नेतृत्व करत आहेत. ओबीसी समाजासाठी त्यांनी अनेक कामे केली आहेत. त्यामुळे त्यांनी आपल्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात ओबीसींच्या हक्कांसाठी आंदोलन उभे करावे. आम्ही त्यांच्या पाठीशी आहोत," असे वडेट्टीवार म्हणाले. त्यांच्या मते, ओबीसी समाजाच्या राजकीय प्रतिनिधित्वावरही परिणाम होत आहे. सरपंच, जिल्हा परिषद, नगरपरिषद आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसींच्या वाट्याला येणाऱ्या जागा कमी होत असल्याचा दावा त्यांनी केला.

वडेट्टीवार यांनी ओबीसी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधांचा मुद्दाही उपस्थित केला. एका बाजूला काही घटकांसाठी वातानुकूलित वसतिगृहांची व्यवस्था केली जात आहे, तर दुसरीकडे ओबीसी विद्यार्थ्यांना साधे वसतिगृहही मिळत नसल्याचा आरोप त्यांनी केला. शिष्यवृत्तीच्या रकमा थकीत असून अनेक विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेचे पैसे वर्षभरापासून मिळाले नसल्याचेही त्यांनी सांगितले.

शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या काही महत्त्वाच्या अधिकारांमध्ये कपात करून ते प्रधान सचिव आणि शिक्षण आयुक्तांकडे सोपविण्याच्या निर्णयावरही वडेट्टीवार यांनी भाष्य केले. स्वयंअर्थसहाय्यित शाळांच्या नव्या तुकड्या व शाखांना मान्यता देणे तसेच विविध शिक्षण मंडळांशी संलग्न होण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यासंबंधीचे अधिकार प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात आले आहेत. सरकारने हा निर्णय प्रशासकीय कामकाज गतिमान करण्यासाठी घेतल्याचे सांगितले असले, तरी वडेट्टीवार यांनी त्यामागे वेगळे कारण असण्याची शक्यता व्यक्त केली. शिक्षणमंत्र्यांचे निर्णय वादग्रस्त ठरत असल्याने सरकारने त्यांच्या अधिकारांची व्याप्ती कमी केली का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. "मंत्री सक्षम असतील तर त्यांना अधिकार देऊन निर्णय घेऊ द्या. सक्षम नसतील तर त्यांना काढून टाका. अशा पद्धतीने अधिकारांना कात्री लावणे म्हणजे त्यांच्या सक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणे आहे," अशी टीका वडेट्टीवार यांनी केली.

# नेपाळ : महिलेला जिवंत बाहेर काढलं

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

नेपाळच्या नुवाकोट जिल्ह्यामधील बेत्रावती भागातील मदत आणि बचाव कार्य सुरु असताना एक आश्चर्यजनक घटना घडली आहे. त्रिशुली नदीमध्ये आलेल्या महापुरानं आणि जमीन खचल्याच्या 11 दिवसानंतर एका महिलेला ढिगाऱ्यातून जिवंतपणे बाहेर काढण्यात आलं आहे. ही महिला बिदूर महापालिका-10 या भागातील रहिवासी असल्याचं स्पष्ट झालं आहे. त्या महिलेचं नाव चंदिका श्रेष्ठ असं आहे, त्यांचं वय 55 ते 56 वर्षांदरम्यान असल्याचं सांगितलं जातंय. मिळालेल्या माहितीनुसार चंदिका श्रेष्ठ या आनंद श्रेष्ठ यांच्या घरामध्ये ढिगाऱ्यात अडकल्या होत्या. महापुरामुळं घराचा एक भाग माती आणि ढिगाऱ्यात दबला होता. शनिवारी सुरक्षा दलांनी त्या महिलेला सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आलं. नुवाकोटचे पोलीस अधिकारी बिपिन रेग्मी यांच्यानुसार ढिगाऱ्यमुळं खचलेल्या घरातून माणसाचा आवाज येत असल्याची माहिती पोलिसांना देण्यात आली होती. यानंतर पोलीस आणि बचावपथकांनी घटनास्थळी पोहोचून ढिगारा हटवण्यास सुरुवात केली. खूप सतर्कतेनं ढिगारा बाजूला केल्यानंतर महिलेला जिवंत बाहेर काढण्यात आलं. महिलेला सुखरुप बाहेर काढताच घटनास्थळी असलेल्या व्यक्तींनी आनंद व्यक्त केला. बचाव पथकाच्या सदस्यांच्या माहितीनुसार चंदिका श्रेष्ठ ढिगाऱ्यात असूनही ती बोलू शकत होती. ढिगाऱ्यातून बाहेर काढल्यानंतर महिलेला जवळच्या आरोग्य केंद्रात नेण्यात आलं आहे. दीर्घकाळ ढिगाऱ्यात अडकल्यानंतर देखील महिलेला जिवंत बाहेर काढणं हे आश्चर्यजनक घटना मानली जातेय.

# संपादकीय

## सामाजिक सलोखा : समाजाची खरी ताकद

समाज किती प्रगत आहे, हे केवळ मोठ्या इमारती, रुंद रस्ते, तंत्रज्ञान किंवा आर्थिक विकासावरून ठरत नाही. समाजातील माणसे एकमेकांकडे किती विश्वासाने आणि आदराने पाहतात, यावर त्या समाजाची खरी प्रगती ठरते. म्हणूनच सामाजिक सलोखा ही केवळ एक आदर्श संकल्पना नसून सुदृढ लोकशाही आणि शांततामय समाजाची मूलभूत गरज आहे.

आज समाजात विविधता मोठ्या प्रमाणावर आहे. जात, धर्म, भाषा, प्रांत, विचारसरणी आणि राजकीय भूमिका वेगवेगळ्या असल्या तरी या विविधतेतूनच भारताची ओळख निर्माण झाली आहे. मतभेद असणे स्वाभाविक आहे; मात्र मतभेदांचे रूपांतर द्वेषात आणि द्वेषाचे रूपांतर संघर्षात होणे धोकादायक आहे.

विशेषतः सोशल मीडियाच्या काळात एखादी अपुरी माहिती, जुना व्हिडिओ किंवा चुकीचा दावा काही क्षणांत हजारो लोकांपर्यंत पोहोचतो. त्यातून गैरसमज निर्माण होतात आणि समाजात तणावाचे वातावरण तयार होते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने माहिती पुढे पाठवण्यापूर्वी तिची सत्यता तपासणे हीदेखील सामाजिक जबाबदारी मानली पाहिजे.

सामाजिक सलोखा टिकवण्याची जबाबदारी केवळ सरकार, प्रशासन किंवा पोलिसांची नाही. राजकीय पक्ष, माध्यमे, सामाजिक संस्था, धार्मिक नेते आणि सामान्य नागरिक—प्रत्येकाची भूमिका महत्त्वाची आहे. राजकारणासाठी समाजात फूट पाडणे सोपे असते; परंतु त्या फुटीवर पुन्हा विश्वासाचा पूल बांधणे अत्यंत कठीण असते. त्यामुळे सार्वजनिक जीवनात जबाबदार भाषा आणि संयमाची अपेक्षा अधिक आहे.

माध्यमांची भूमिकाही येथे अत्यंत महत्त्वाची ठरते. समाजातील प्रश्न मांडताना सनसनाटीपेक्षा सत्याला, आरोपांपेक्षा पुराव्याला आणि संघर्षापेक्षा संवादाला महत्त्व दिले गेले पाहिजे. माध्यमांनी समाजाचे तापमान वाढवण्याऐवजी समाजाला आरसा दाखवण्याचे काम केले पाहिजे. निष्पक्ष आणि विश्वासार्ह पत्रकारिता ही सामाजिक सलोख्याची मजबूत पायाभरणी ठरू शकते. त्याचप्रमाणे धर्म हा श्रद्धेचा विषय आहे; तो संघर्षाचे कारण बनू नये. प्रत्येकाला आपल्या श्रद्धेचे पालन करण्याचा अधिकार आहे, पण त्या अधिकारासोबत दुसऱ्याच्या श्रद्धेचा आणि स्वातंत्र्याचा आदर करण्याची जबाबदारीही येते. धर्म माणसाला जोडण्यासाठी असतो; माणसांमध्ये भिंती उभ्या करण्यासाठी नव्हे. आपल्या देशाची



ताकद त्याच्या विविधतेत आहे. वेगवेगळ्या भाषा, परंपरा आणि श्रद्धा असूनही आपण एकत्र राहिलो, म्हणूनच भारतीय लोकशाहीची वाटचाल शक्य झाली. ही एकजूट टिकवण्यासाठी संवादाची दारे कायम उघडी ठेवावी लागतील. आज गरज आहे ती 'आपण विरुद्ध ते' या मानसिकतेतून बाहेर पडण्याची. आपली मते वेगळी असू शकतात, पण देश एक आहे; श्रद्धा वेगळी असू शकते, पण माणुसकी एक आहे. सामाजिक सलोखा हा सरकारच्या आदेशाने निर्माण होत नाही. तो प्रत्येकाच्या दैनंदिन वर्तनातून घडतो. शेजाऱ्याचा धर्म, सहकाऱ्याची जात किंवा समोरच्या व्यक्तीची राजकीय भूमिका न पाहता त्याच्याकडे माणूस म्हणून पाहण्याची वृत्ती निर्माण झाली, तर समाज अधिक मजबूत होईल. समाजात शांतता हवी असेल तर संवाद वाढवावा लागेल; विश्वास हवा असेल तर पारदर्शकता वाढवावी लागेल आणि सलोखा हवा असेल तर माणुसकीला सर्वांत वरचे स्थान द्यावे लागेल. कारण शेवटी विकासाच्या प्रत्येक रस्त्याला सुरक्षित आणि सुसंवादी समाजाचीच गरज असते.

## संस्कृत सुभाषित

अपमान होई अति परिचये, अनादर तो अति जाण्याते, मलय पर्वतावरी भिल्ल स्त्री चंदनतरूचे जळण करी ॥

अर्थ : अति परिचयामुळे अपमान होतो, सतत जाण्यामुळे अनादर होतो. जसे मलय पर्वतावरील भिल्लसुंदरी चंदन वृक्षाच्या झाडाचा जळण म्हणून उपयोग करते तशी गत होते. पण जेथे चंदनानीच जंगले भरलेली तेथे सरपणासाठी त्याचा उपयोग होतो, हे अति परिचयामुळेच होते.

## गुरु वचन

### पंचायतीचा निर्णय

एकदा एक हंस आणि हंसिणी हरिद्वारच्या सुरम्य वातावरणातून भटकत उजाड, निर्जन आणि वाळवंटात आले. हंसिणी हंसाला म्हणाली की, आपण कोणत्या भागात आलो आहोत? इथे तर पाणी नाही, जंगल आणि थंड हवादेखील नाही. इथे तर आपले जगणे कठीण होईल. भटकताना सायंकाळ झाली तेव्हा हंसाने हंसिणीला म्हटले की, आजची रात्र कशी तरी घालवू या. आपण सकाळी हरिद्वारला परतू या!

रात्र झाली तेव्हा झाडाखाली हंस आणि हंसिणी थांबले होते त्या झाडावर एक घुबड बसले होते.ते जोराने ओरडू लागले. हंसिणीने हंसाला विचारले अरे इथे तर रात्री झोपू शकत नाही. हे घुबड ओरडत आहे. हंसाने पुन्हा हंसिणीची समजूत काढली की, कशी तरी रात्र घालवू या.आता मला कळले की हा प्रदेश ओसाड आहे.असे घुबड ज्या भागात राहतील तो तर विराण आणि ओसाड राहीलच. झाडावर बसलेले घुबड दोघांचे बोलणे ऐकत होते. सकाळ झाली तेव्हा घुबड खाली आले आणि त्याने म्हटले की, हंसभाऊ माझ्यामुळे रात्री तुम्हाला खूप त्रास झाला मला माफ कर. हंस म्हणाला, काही हरकत नाही, तुझे आभार!

असे म्हणून हंस आपल्या हंसिणीला घेऊन जसाच पुढे निघाला तेव्हा मागून घुबड ओरडले, अरे हंसा माझ्या पत्नीला घेऊन कुठे चाललास? हंस चपापला त्याने म्हटले तुझी पत्नी? अरे , ही हंसिणी आहे, माझी पत्नी आहे. माझ्यासोबत आली होती, माझ्यासोबत जात आहे.

घुबड म्हणाले, चूप बस, ही माझी पत्नी आहे.दोघांचा वाद वाढला. सर्व लोक गोळा झाले. अनेक गावातील जनता बसली. पंचायत बोलावण्यात आली. पंच लोकही आले. त्यांनी विचारले, कशाचा वाद आहे? लोकांनी सांगितले घुबडाचे म्हणणे आहे की, हंसिणी त्याची पत्नी आहे आणि हंस म्हणतोय हंसिणी त्याची पत्नी आहे!

दीर्घ बैठक आणि पंचायतीनंतर पंच बाजूला झाले आणि म्हणाले की, हंसिणी हंसाची पत्नी आहे, ही गोष्ट खरी आहे. मात्र हंस आणि हंसिणी तर आता थोड्यावेळात या गावातून निघून जातील. आमच्यात तर फक्त घुबडच राहील. त्यामुळे निर्णय घुबडाच्या बाजूनेच द्यायचा आहे. मग पंचांनी आपला फैसला सुनावला आणि म्हटले की, सर्व तथ्य आणि पुरावे तपासल्यानंतर ही पंचायत या निष्कर्षावर येते की, हंसिणीची घुबडाची पत्नी आहे आणि हंसाला ताबडतोब गाव सोडून जाण्याचा आदेश देते.

हे ऐकताच हंस हैराण झाला आणि रडू लागला. पंचायतने चुकीचा निर्णय दिला असे ओरडू लागला. घुबडाने माझी पत्नी घेतली! रडत ओरडत तो निघाला तेव्हा घुबडाने त्याला हाक मारली. ऐ मित्र हंस, थांब ! हंसाने रडतच विचारले बाबा आता आणखी काय करणार आहेस? पत्नी तर तू घेतलीच आहेतस. आता काय जीव घेणार?

घुबड म्हणाले, नाही मित्रा, ही हंसिणी तुझी पत्नी होती आणि आहे! मात्र काल रात्री जेव्हा मी ओरडत होतो तेव्हा तू तुझ्या पत्नीला म्हणाला होतास की, हा प्रदेश विराण आणि ओसाड आहे कारण इथे घुबड राहतो! मित्रा,हा प्रदेश विराण आणि ओसाड तो इथे घुबड राहता म्हणून नाही तर, इथे असे पंच राहतात जे घुबडाच्या बाजूने निर्णय देतात.

स्वातंत्र्याच्या एवढ्या वर्षानंतरही आपल्या देशाच्या दुर्दशेचे मूळ कारण बहुधा हेच आहे की, आपण आपला निर्णय घुबडांच्या बाजूने सुनावला आहे. त्याला आपणच जबाबदार आहोत.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:आर्द्रा १९:५२:२६ |
| ६ सप्टेंबर २०२६ | योग:सिद्ध ०९:४४:२७ |
| रविवार | करण:वणिज ०८:४२:०३ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:विष्टि १९:२९:२९ |
| श्रावणशके संवत्– १९४८ | करण:बव ३०:१६:४५+ |
| संवत्सर –पराभवनाम | सूर्य:सिंह |
| अयन– दक्षिणयन | चन्द्र:मिथुन |
| मास– आषाढ | हिजरी सन् – १४४८ |
| ऋतु– सौर शरद | मुस्लिम मास – रबिलावल |
| कृष्ण पक्ष | तारीख – २२ |
| तिथि:दशमी १९:२९:२९ | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०६१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 7 | 5 | | | | 3 | |
| | 3 | | 8 | 2 | 9 | | | |
| | 4 | | | 6 | 7 | | 5 | 8 |
| | | | | | 2 | 3 | 1 | |
| 3 | 2 | 8 | | | | 4 | 6 | 5 |
| | 9 | 1 | 4 | | | | | |
| 9 | 1 | | 7 | 3 | | | 2 | |
| | | | 2 | 9 | 6 | | 7 | |
| | 7 | | | | 8 | 6 | | |

**: सूडोकु :**

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १०६० चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 5 | 7 | 6 | 3 | 2 | 8 | 9 | 4 |
| 2 | 9 | 6 | 8 | 1 | 4 | 5 | 7 | 3 |
| 4 | 3 | 8 | 7 | 9 | 5 | 1 | 2 | 6 |
| 6 | 1 | 9 | 2 | 8 | 3 | 7 | 4 | 5 |
| 5 | 4 | 2 | 1 | 6 | 7 | 3 | 8 | 9 |
| 8 | 7 | 3 | 5 | 4 | 9 | 6 | 1 | 2 |
| 7 | 2 | 4 | 3 | 5 | 8 | 9 | 6 | 1 |
| 9 | 6 | 5 | 4 | 7 | 1 | 2 | 3 | 8 |
| 3 | 8 | 1 | 9 | 2 | 6 | 4 | 5 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १६६६ – 'ग्रेट फायर ऑफ लंडन' आटोक्यात आली.
- १९३९ – दुसरे जागतिक युद्ध – दक्षिण आफ्रिकेने जर्मनीविरुद्ध युद्धाची घोषणा केली.
- २००८ – पाकिस्तान पीपल्स पार्टीचे (पीपीपी) सहअध्यक्ष आसिफ अली झरदारी यांची पाकिस्तानच्या नव्या राष्ट्रपतीपदी निवड झाली.

### राष्ट्रीय

- १७९० – संतचरित्रकार महिपतीबुवा तारहाबादकर यांनी समाधी घेतली.
- १९१९ – कोल्हापूर संस्थानातील सर्व सार्वजनिक ठिकाणे व बिहिरी शाहूमहाराजांनी दलितांसाठी खुल्या केल्या.
- १९६५ – पाकिस्तानने भारताविरुद्ध युद्ध पुकारले.
- १९९० – 'प्रसारभारती' हे विधेयक लोकसभेत मंजूर करण्यात आले.
- २००७ – उत्तराखंडच्या पिथौरागढ जिल्ह्यात दोन जागी झालेल्या भूस्खलनात १३ जण ठार झाले.

### जन्म

- १७६६ – आधुनिक अणुसिद्धान्ताचे नजक, वायूंच्या गुणधर्मांचे अभ्यासक इंग्रज पदार्थवैज्ञानिक आणि रसायनशास्त्रज्ञ जॉन डाल्टन.
- १९०१ – जुन्या जमान्यातील मराठी रंभूमीवरील अभिनेत्री कमलाबाई (बेबी).
- १९०५ – सत्यचरण चॅटर्जी, भारतातील प्रसिद्ध भूगर्भशास्त्रज्ञ यांचा.

### निधन

- १७७९ – भारताचे माजी यष्टिरक्षक जे. जी. नवले.
- १९७२ – सुप्रसिद्ध सरोदिये अल्लादिया खाँ.
- १९८५ – रॉडनी पोर्टर,१९७२चे वैद्यकाचे नोबेल पारितोषिक विजेता.
- १९९५ – मीनाताई ठाकरे, बाळासाहेब ठाकरे यांच्या पत्नी.

## : SMS :

Dost: Shaadi kaisi chal rahi hai?
Pappu: Ek dum first class, bas biwi ko abhi tak pata nahi chala main kaun hu!

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३०.३ | २३ |
| अहमदनगर | ३०.७ | २२.१ |
| अकोला | ३१.८ | २४.४ |
| अमरावती | ३०.६ | २३.८ |
| बीड | ३६.५ | २५.२ |
| भंडारा | ३५.१ | २४.६ |
| बुलढाणा | ३९.५ | २७.८ |
| चंद्रपूर | ३७.५ | २५.९ |
| चेन्नई | ४० | २७.६ |
| नवी दिल्ली | ३९.५ | २७.८ |
| धुळे | ३१ | २५ |
| गोंदिया | ३२.८ | २४.७ |
| जळगाव | २९.७ | २३.३ |
| कोल्हापूर | २९.९ | २२.८ |
| लातूर | ३१.५ | २३ |
| मुंबई | ३३.५ | २७.६ |
| नागपूर | ३५.२ | २४.२ |
| नांदेड | ३२.५ | २५.३ |
| नंदूरबार | २७.१ | २४.४ |
| नाशिक | ३०.२ | २३ |
| पुणे | २६ | २२.१ |
| पंढरपूर | ३४.६ | २३.६ |
| सातारा | ३०.६ | २१.७ |
| सांगली | ३१.७ | २२.८ |
| सोलापूर | ३३.४ | २३.९ |
| वर्धा | ३५.५ | २४.४ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** रचनात्मक कामात यश मिळेल. आर्थिक योग उत्तम आहे. कुटुंबातील व्यक्तिंचे सहकार्य घ्या.

**तुळ :** फायदेशीर प्रवास होण्याची शक्यता आहे. कुटुंबातील वयस्कर व्यक्तींच्या प्रकृतीची काळजी घ्या.

**वृषभ :** प्रभावी वातावरणाचा उपयोग होईल. अती उत्साहीपणा दाखवू नका. अचानक फायदा मिळण्याचे योग आहेत.

**वृश्चिक :** व्यापारात कोणावरही विश्वास दाखवू नका. कर्ज घेण्याची वेळ येऊ शकते. बौद्धीक अडचणी दूर होतील. प्रगतीचे मार्ग मोकळे होतील.

**मिथुन :** मान सन्मान मिळेल. आप्तजनात मान सन्मान मिळेल. खाण्या–पिण्यावर लक्ष द्या. रचनात्मक कामात लक्ष लागेल.

**धनु :** मान सन्मान मिळेल. कौटुंबिक समस्यामध्ये लक्ष राहणार नाही. अनिश्चितेमुळे वैचारिक धाडसामध्ये कमतरता राहील.

**कर्क :** पूर्व आपले प्रयत्न आज सफल होतील. व्यापारात योग्यवेळी घेतलेला निर्णय फायदेशीर राहील. शिक्षणात यश मिळेल.

**मकर :** कौटुंबिक समस्या दूर होईल. वाद–विवाद संपुष्टात येतील. नौकरी करणाऱ्यांना मनासारखी बढती, बदली होण्याची शक्यता आहे.


**सिंह :** महत्वपूर्ण व्यक्तिंचा संप होईल. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. कौटुंबिक जीवन आनंदी राहील. वाहन चालवतांना सावधानी बाळगा. आरोग्य चांगले राहील.

**कुंभ :** कौटुंबिक वातावरण आनंदमय राहील. नातेवाईकांशी असलेल्या संबंधात मर्यादा राखा. व्यापारात नवीन संधी मिळतील.

**कन्या :** केलेल्या कामाचे चीज होईल. आपल्या कलेचे सादरीकरण करण्याची संधी मिळेल. नवीन वस्तु विकत घेण्याचे योग आहेत.

**मीन :** जबाबदारीची कामे वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. व्यापारात नवीन योजनेचा शुभारंभ होण्याचा योग आहे. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०६१



**आडवे शब्द**

१. '--- खाई मिठाई!'
३. दाखला देऊन
६. सर्वेक्षण
८. ऋण
९. धडकण्याची आज्ञा
१०. वजनदार
११. भारत–पाकिस्तान सीमाभागातील वाळवंट
१२. डोंगराची उतरण
१४. प्रधान
१५. नक्कल करणारा
१७. उणे
१९. मूलभूत गरजांपैकी एक
२०. तहहयात
२१. अटीची भाषा
२२. दु:ख
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. प्रेमळपणा
२७. एक गड्डी भाजी
२९. घ्राणोंद्रिय
३१. आवाज, गोंगाट
३२. पद्धत, प्रथा
३४. संतुष्ट
३५. लटलट
३६. महिरप
३७. भरवसा
३८. कुबेराचा सेवक
४०. मांडणी, सजावट
४२. भट्टी (इंग्रजी)
४३. जेव्हा
४४. धमकी
४६. गवंडी
४७. माफी (मागणे)
४९. सिद्ध
५०. नमस्काराचा एक शब्द
५१. स्वयंपाकाचे शास्त्र
५२. दहावी रास
५४. डाळ–तांदूळ धुण्याचे पात्र
५५. खडूस
५८. सजा
५९. शब्दाचे वजन
६१. बट
६२. व्यवस्था
६६. सोने
६९. जीत
७०. व्याकूळ
७१. प्रश्नोत्तरे
७४. जननी, आई
७५. धरबंद, मर्यादा
७६. शिखराचे टोक

**उभे शब्द**

१. आडव्या बांध्याचा, उंचनिंच
२. हवेपेक्षा हलके द्रव्य
३. लत लागणे
४. तात्काळ समर्पक उत्तर देणारा
५. नेहमीची बोंब
७. वजनाला कमी
८. धोतराचा एक प्रकार, ---- काठी
१०अ. संस्कृतातील डुक्कर, मराठीत सुलभ
१३. लोकमान्यांनी सार्वजनिक केलेला उत्सव
१५. आकाश
१६. चंद्र
१८. शत्रूनाशाचे मंत्र–तंत्र
२३. मनाचा ओढा
२४. सन्माननीय, प्रतिष्ठित
२५. वरपांगी
२६. दिनांक
२८. बर्फाचा डोंगर
३०. काळी मैना
३३. निष्णात, वाकबगार
३४. जिवलग मित्र
३६. बंदी
३७. परीक्षा घेणारा
३९. माफी मागणारा
४१. छोटी लढाई
४५. डोके
४६. श्रीरामाचे स्तोत्र कवच
४८. मर्कट
५१. माणसाळणारा प्राणी
५३. प्रज्ज्वलित, तापलेले
५५. दाण्याचा भगरा
५६. बांगला रुपाया
५७. अंतरिक्ष
५८. शिव्यांनी युक्त
६०. रोखलेली नजर
६१. अर्धांगवायू
६३. फळातील द्रव
६४. वजन, बोजा
६५. निमगोरा
६७. नको असता, गैरहजेरीत
६८. अंजन
७२. वेल
७३. बगळा

**जम्बो शब्दकोडे क्र. १०६० चे उत्तर**

आडवे उत्तर : १.ज्ञानेश्वर तुकाराम ७.नकुलसहदेव ११.नट १२.नमन १२अ.रज १३.समाधान १४.कनक १६.मकार १८.वणवण १९.वावर २०.भास्कर २१.पान २३.सडा २४.नोकरी २५.तडकसार २७.पोटरी २८.अहोरात्र ३०.माला ३२.रास ३३.खोट ३४.पसारा ३५.झाड ३६.उमा ३८.भयंकर ४०.जरा ४२.कापडचोपड ४४.सवालजबाब ४६.सारा ४८.सुमन ४९.नस ५१.वखार ५३.हमाल ५४.भूदान ५६.कलप ५८.बुळा ५९.भय ६१.विपरीत ६२.रामदास ६५.जपा ६८.नरम ७०.लवमात्र ७१.मस्त ७२.वसा ७५.कारभार ७७.अचानक ७८.तूपसाखर ७९.कवन ८०.प्रजा

उभे उत्तर : १.ज्ञानदेव बाळ माझा २.नेट ३.रममाण ४.कानन ५.राम ६.मनकवडा ७.कणीक ८.सरकार ९.हजर १०.वर्तमानपत्र १३.सवलत १५.नर १६.मस्करी १७.गर १९.वासर २०.भाकरी २२.आकस २४.नोट २६.डराव डराव २७.पोटभर २८.असा २९.होरा ३१.लाडका ३४.परवानगी ३६.उपकार ३७.माड ३९.कसम ४०.जबाबदारी ४१.राब ४३.पसा ४५.जनक ४७.सोहळा ४८.सुलभ ५०.सल ५२.खानदान ५४.भूपती ५५.नतमस्तक ५७.पराग ६०.यजमान ६३.सरकार ६४.कलरव ६६.पात्र ६७.ताव ६९.मर ७१.मनन ७३.सातू ७४.ठसा ७६.भाक ७७.अजा

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत राष्ट्रभक्ती रुजविण्यावर भर द्यावा

## शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

■ मालेगाव (दै. संध्या)

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त साजरा होणारा शिक्षक दिन हा गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याबरोबरच त्यांच्यामध्ये संस्कार, कर्तव्यभावना, सामाजिक जाणीव आणि राष्ट्रभक्तीची भावना रुजविणे ही शिक्षकांची महत्त्वाची जबाबदारी आहे. आई-वडिलानंतर गुरुजनांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असून, विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांचा आदर व सन्मान करावा, असे प्रतिपादन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केले.

शिक्षक दिनानिमित्त शालेय शिक्षण विभाग, पंचायत समिती मालेगाव मार्फत शिवगंगा लॉन्स, दाभाडी येथे आयोजित कार्यक्रमात मंत्री श्री. भुसे बोलत होते. यावेळी मालेगाव पंचायत समितीचे गट शिक्षण अधिकारी निलेश पाटील, विस्तार अधिकारी तथा वैज्ञानिक दृष्टीकोन समिती अध्यक्ष अमोल निकम, मालेगाव तालुक्यातील शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य, शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

मंत्री श्री.भुसे म्हणाले की, आजच्या काळात विद्यार्थ्यांना केवळ गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे पुरेसे नाही, तर त्यांच्यामध्ये चांगले संस्कार रुजविणेही तितकेच महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांचा, आजी-आजोबांचा आणि गुरुजनांचा आदर करावा. शाळेत आल्यानंतर शिक्षकांना मान-वंदना देण्याची संस्कृती निर्माण झाली पाहिजे. शिक्षक हे केवळ विद्यार्थ्यांना विषयाचे ज्ञान देणारे नसून समाजाची भावी पिढी घडविणारे महत्त्वाचे घटक आहेत. त्यामुळे शिक्षकांच्या कार्याचा सन्मान करण्यासोबतच त्यांना आवश्यक त्या सुविधा व सहकार्य देण्याची शासनाची भूमिका आहे. मालेगाव तालुक्यातील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत केलेली कामगिरी विशेष कौतुकास्पद असून जिल्ह्यात प्रथम आणि राज्यात दहावा क्रमांक मिळविला आहे. शिष्यवृत्ती परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला चालना मिळते. मात्र, आर्थिक परिस्थितीमुळे कोणताही विद्यार्थी या परीक्षेपासून वंचित राहू नये, यासाठी शासनाने महत्त्वाचा



निर्णय घेतला आहे. शिष्यवृत्ती परीक्षेची फी भरण्यास आर्थिक अडचण असलेल्या विद्यार्थ्यांना आता जिल्हा परिषद सेस निधीतून फी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे इच्छुक प्रत्येक विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती परीक्षेला बसण्याची संधी मिळणार आहे. पूर्वी शिष्यवृत्ती परीक्षा चौथी व सातवीच्या स्तरावर घेतली जात होती. त्यानंतर ती पाचवी व आठवीच्या स्तरावर घेण्यात येत होती. अनेक शाळांची रचना पहिली ते चौथी तसेच पहिली ते सातवी अशी असल्याने विद्यार्थ्यांना योग्य त्या टप्प्यावर शिष्यवृत्ती परीक्षेची संधी मिळावी, यासाठी पुन्हा चौथी व सातवीच्या स्तरावर परीक्षा घेण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. हिंदुहृदयसम्राट माननीय बाळासाहेब ठाकरे यांचे जन्मशताब्दी वर्ष आणि प्रधानमंत्री यांच्या ७५ व्या वर्षानिमित्त चला शाळेत जाऊया या अभियानाचा राज्यव्यापी शुभारंभ मंत्री श्री.भुसे यांच्या हस्ते करण्यात आला. हे अभियान दिनांक 5 सप्टेंबर शिक्षक दिन ते 20 ऑक्टोबर 2026 दसऱ्यापर्यंत राबविण्यात येणार आहे. यावेळी मंत्री श्री. भुसे म्हणाले, शाळांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून शाळेतील सकारात्मक बाबी समाजासमोर आणण्याबरोबरच ज्या ठिकाणी अडचणी आहेत, त्या दूर करण्यासाठी प्रशासन, शिक्षक, पालक, माजी विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन समिती आणि ग्रामस्थ यांनी एकत्रितपणे काम करण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक जिल्ह्यासाठी मंत्रालयापासून आयुक्तालयापर्यंतच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना शिक्षण पालक म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. संबंधित अधिकारी आपल्या दत्तक जिल्ह्यातील शाळांना भेटी देऊन चांगल्या कामाचे कौतुक करतील तसेच आवश्यक त्या ठिकाणी मार्गदर्शन व सहकार्य करतील. शाळांच्या अडचणी स्थानिक पातळीवर सोडविण्यासाठी या यंत्रणेचा उपयोग होईल. मालेगाव तालुक्यातील शाळांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी आरओ फिल्टरची सुविधा देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. शाळांच्या गरजेनुसार आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे, असे त्यांनी सांगितले. पवित्र पोर्टलच्या माध्यमातून राज्यात सुमारे ३० हजार शिक्षकांची भरती करण्याची प्रक्रिया सुरू आहे. पहिल्या टप्प्यात सुमारे १३ हजार शिक्षकांची नियुक्ती करण्यात येत असून, नाशिक जिल्ह्यालाही मोठ्या प्रमाणात शिक्षक उपलब्ध होणार आहेत. ज्या शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता आहे, त्या ठिकाणी गुणवत्तेच्या आधारे शिक्षक उपलब्ध करून देण्यात येतील. प्रतिकूल परिस्थितीतही समर्पित भावनेने काम करणाऱ्या शिक्षकांची अनेक उदाहरणे महाराष्ट्रात आहेत. आदिवासी पाड्यावरील जिल्हा परिषद शाळेत कार्यरत शिक्षक केशव गावित यांच्या कार्याचा उल्लेख करताना मंत्री श्री. भुसे यांनी त्यांच्या समर्पित वृत्तीचे कौतुक केले. शाळा ही केवळ शिक्षक आणि विद्यार्थ्यांची नसून संपूर्ण गावाची जबाबदारी आहे. शाळा व्यवस्थापन समिती, माजी विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ आणि शिक्षक यांनी एकत्रितपणे काम केल्यास शाळांचा सर्वांगीण विकास साधता येतो. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ शाळांपर्यंत पोहोचविण्यासाठी या सर्व घटकांचा सहभाग आवश्यक आहे. शासकीय शिक्षण व्यवस्थेची गुणवत्ता व क्षमता वाढविण्यावर भर देण्यात येईल. विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयातच गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, या दृष्टीने शिक्षण विभाग काम करीत आहे. विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या हिताचा निर्णय लवकरच संपूर्ण महाराष्ट्रासाठी घेण्यात येईल, असेही मंत्री श्री. भुसे यांनी सांगितले. मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियानात मालेगाव गटात सन २०२४-२५ मध्ये पुढील प्रमाणे बक्षीस पात्र शाळांना रोख रकमेच्या स्वरुपात पारितोषिक देण्यात आले.

### शिष्यवृत्ती परिक्षेतील गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा झाला सन्मान

मालेगाव गटात सन-२०२६ मध्ये पुढील प्रमाणे विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ताधारक पात्र झाले. इयत्ता ४ थी - २२९ विद्यार्थी, इयत्ता ५ वी - १३५ विद्यार्थी, इयत्ता ७ वी - २०३ विद्यार्थी, इयत्ता ८ वी - ११५ विद्यार्थी असे एकूण ६८२ विद्यार्थी शिष्यवृत्ती मिळण्यासाठी पात्र ठरले असून सदरची संख्या ही नाशिक जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधील अव्वल स्थानी आहे. इयत्ता ४ थी व ५ वी तील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी ५०००/- असे तीन वर्षासाठी मिळतील तर इ. ७ वी व ८ वी तील शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी रु. ७५००/- असे पुढील तीन वर्षासाठी मिळणार आहे. प्रातिनिधिक स्वरूपात गुणवंत विद्यार्थांचा व शिक्षकांचा सन्मान मंत्री श्री.भुसे यांच्या हस्ते करण्यात आला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### जनजागृती सेवा संस्थेच्या आरती संग्रहाचे प्रकाशन; अभय खडपकर यांचे कौतुक

कणकवली : दैनिक संध्या

जनजागृती सेवा संस्थेतर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या आरती संग्रहाचे प्रकाशन शुक्रवारी कणकवली येथे मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी बोलताना अभिनेते अभय खडपकर यांनी आरती संग्रहाचे कौतुक करत, “अत्यंत दर्जेदार आणि वाचण्यासाठी सुलभ असा हा आरती संग्रह कोकणातील प्रत्येक घरापर्यंत पोहोचावा,” अशा शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे उद्‌घाटन अभय खडपकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने, तर माजी जिल्हा परिषद सदस्या राजश्री धुमाळे यांच्या हस्ते गणेश प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर नगरसेविका मनस्वी ठाणेकर, अक्षरोत्सव प्रमुख तथा पत्रकार निकेत पावसकर, सेवानिवृत्त वाहतूक निरीक्षक प्रकाश साखरे, उद्योजक मिथुन ठाणेकर आणि जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते आरती संग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. संग्रहाचे अवलोकन केल्यानंतर उपस्थितांनी त्याचे विशेष कौतुक केले. जनजागृती सेवा संस्थेच्या सातत्यपूर्ण सामाजिक, सांस्कृतिक आणि जनजागृतीपर उपक्रमांचेही यावेळी गौरवोद्गार काढण्यात आले. कोकणासह महाराष्ट्रातील विविध भागांत संस्थेने उभारलेले कार्य प्रेरणादायी असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. कार्यक्रमात गुरुनाथ तिरपणकर यांच्या हस्ते सर्व मान्यवरांचा शाल, श्रीफळ, गुलाबपुष्प, संस्था अहवाल, आभारपत्र, आरती संग्रह आणि गणेश प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार गुरुनाथ तिरपणकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे खजिनदार दत्ता कडुलकर आणि गंधाली तिरपणकर यांचे विशेष सहकार्य लाभले.

### ‘स्कूल बॅग पॉलिसी २०२०’ची काटेकोर अंमलबजावणी करा

पुणे : दैनिक संध्या

राज्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करून शिक्षण प्रक्रिया अधिक आनंददायी, सुलभ व कृतीप्रधान करण्यासाठी केंद्र शासनाच्या ‘स्कूल बॅग पॉलिसी-२०२०’ ची सर्व प्रकारच्या शाळांमध्ये प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश प्राथमिक शिक्षण संचालनालयाने दिले आहेत. विद्यार्थ्यांच्या दप्तराचे वजन त्यांच्या शारीरिक वजनाच्या साधारणतः १० टक्क्यांपेक्षा जास्त होणार नाही, याची काटेकोर दक्षता शाळांनी घ्यावी, असे शिक्षण संचालक (प्राथमिक) शरद गोसावी यांनी परिपत्रकाद्वारे कळविले आहे. जास्त वजनाच्या दप्तरामुळे विद्यार्थ्यांच्या पाठीचा कणा, खांदे व शारीरिक वाढीवर होणारे विपरीत परिणाम टाळण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. या धोरणानुसार, पूर्व-प्राथमिक वर्गातील लहान मुलांना शक्यतो शाळेत दप्तर आणण्याची आवश्यकता भासणार नाही, या दृष्टीने शाळांनी नियोजन करावे. मुख्याध्यापक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दररोज अनावश्यक पाठ्यपुस्तके, वह्या किंवा इतर शैक्षणिक साहित्य आणण्यास सांगू नये, तसेच त्या दिवसासाठी आवश्यक असलेलीच पुस्तके आणली जावीत यासाठी वर्गनिहाय 'दप्तर वेळापत्रक' तयार करावे. याशिवाय, विद्यार्थ्यांनी दररोज सर्व पुस्तके घरी नेण्याची आवश्यकता भासू नये म्हणून शाळांनी वर्गखोल्यांमध्ये कपाटे, शेल्फ किंवा लॉकरची सुरक्षित व्यवस्था उपलब्ध करून द्यावी. घरातून जड पाण्याची बाटली वाहून आणावी लागू नये यासाठी शाळांनी स्वच्छ व पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि स्कूल बॅग पॉलिसीनुसार, इयत्ता ६ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी वर्षभरात १० दिवसांचा दप्तरविरहित कालावधी आयोजित करण्यात यावा. या कालावधीत स्थानिक कारागीर व व्यावसायिकांच्या मार्गदर्शनाखाली सुतारकाम, बागकाम, मातीची भांडी बनविणे, हस्तकला, कृषीविषयक व स्थानिक व्यवसायांची ओळख यांसारखे प्रत्यक्ष अनुभवाधारित उपक्रम राबविले जाणार आहेत. तसेच वर्षभरात क्रीडा, बौद्धिक खेळ, वाचन, कथाकथन, पर्यावरण संवर्धन आणि क्षेत्रभेटी अशा कृतीप्रधान दिवसांचे आयोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शाळांनी विद्यार्थ्यांच्या व दप्तराच्या वजनाची नियमित तपासणी करून त्याची नोंदवहीत नोंद ठेवावी आणि वजन निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त आढळल्यास तत्काळ सुधारणा करावी. पालक सभांमधूनही पालकांना दप्तरात अनावश्यक वस्तू न ठेवण्याबाबत मार्गदर्शन करावे.

## महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्थेतर्फे ११ सप्टेंबरला एकदिवसीय प्रशिक्षण

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र मानसिक आरोग्य (शासकीय संस्था) संस्थेतर्फे 11 सप्टेंबरला ‘ एकदिवसीय आत्महत्या प्रतिबंधक नियंत्रक प्रशिक्षण कार्यशाळे’चे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती या संस्थेचे सहयोगी प्राध्यापक डॉ.प्रफुल्ल कापसे यांनी दिली. या कार्यशाळेत विद्यार्थी, शिक्षकांसह सामाजिक कार्यकर्त्यांना सहभागी होता येणार आहे. ही कार्यशाळा पाषाण येथे महाराष्ट्र मानसिक आरोग्य (शासकीय संस्था) येथे होणार आहे. मानसिक आरोग्या बाबत जनजागृती करण्यासह आत्महत्येच्या धोक्याची लक्षणे वेळीच ओळखून संबंधित व्यक्तीला योग्य मदतीशी जोडण्यासाठी आवश्यक कौशल्ये प्रशिक्षणातून दिली जाणार आहेत. मानसिक आरोग्याच्या समस्यांकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे आणि संकटाच्या काळात व्यक्तीला आवश्यक आधार मिळवून देणे, हा या प्रशिक्षणाचा प्रमुख उद्देश आहे. प्रशिक्षणा दरम्यान मानसिक आरोग्याविषयीची समज वाढविण्यासोबतच आत्महत्येच्या प्रवृत्तीशी संबंधित मूलभूत बाबी समजावून सांगण्यात येणार आहेत. या प्रशिक्षणासाठी स्वयंसेवक, विद्यार्थी, संशोधक, शिक्षक व प्राध्यापक, आरोग्य क्षेत्रातील व्यावसायिक, सामाजिक कार्यकर्ते, मानसशास्त्रज्ञ, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी यांच्यासह गरजू व्यक्तींना मदत व आधार देण्याची इच्छा असलेल्या कोणत्याही व्यक्तीला सहभागी होता येणार आहे. प्रशिक्षणात आत्महत्या प्रतिबंधासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाणार आहे. तसेच मानसिक आरोग्याच्या समस्या वेळीच ओळखणे, योग्य वेळी हस्तक्षेप करणे आणि संकटग्रस्त व्यक्तीला आवश्यक मदत मिळवून देणे याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. प्रशिक्षणाच्या माध्यमातून मानसिक आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ, व्यावसायिक आणि विविध संस्थांशी संपर्क व संवाद साधण्याची संधी सहभागी व्यक्तींना मिळणार आहे. प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या सहभागींचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांना नोंदणी आवश्यक आहे. या उपक्रमात समाजातील अधिकाधिक नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेचे (शासकीय) डॉ.कापसे यांनी केले आहे.

उच्च शिक्षण व तंत्र शिक्षण मंत्री नामदार चंद्रकांत पाटील यांच्या आश्वासनानंतर भारतीय मजदूर संघांचे

## शिक्षक दिनाचे धरणे आंदोलन तात्पुरते स्थगित

■ पुणे (दै. संध्या)

सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे 20 महिन्यांहून अधिक काळाचे वेतन थकीत असल्याच्या गंभीर प्रश्नावर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्यासोबत भारतीय मजदूर संघाच्या शिष्टमंडळाची सकारात्मक चर्चा झाली. या चर्चेनंतर दि. 5 सप्टेंबर, शिक्षक दिनी मंत्री पाटील यांच्या निवासस्थानासमोर आयोजित करण्यात आलेले धरणे आंदोलन स्थगित करण्यात आले आहे. अशी माहीती भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश संघटन सचिव बाळासाहेब भुजबळ यांनी सांगीतले आहेत. या बैठकीस भारतीय मजदूर संघ अध्यक्ष अर्जुन चव्हाण, सागर पवार, अनिकेत जाधव, औदुंबर ताठे, शुभम फालके उपस्थित होते.मंत्री चंद्रकांत पाटील यांनी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर सकारात्मक भूमिका घेत, “सिंहगड संस्थेतील कर्मचाऱ्यांना निश्चितच न्याय देण्यात येईल,” असे आश्वासन दिल्याची माहिती भारतीय मजदूर संघाने दिली. या प्रश्नावर संबंधित सर्व पक्षांची महत्त्वपूर्ण बैठक दि. 13 सप्टेंबर 2026 रोजी आयोजित करण्यात येणार आहे. भारतीय मजदूर संघाने स्पष्ट केले की, आंदोलन स्थगित करणे ही माघार नसून शासनाच्या आश्वासनाच्या



### १३ सप्टेंबरला महत्त्वपूर्ण बैठक; सिंहगड कर्मचाऱ्यांना न्यायाचे आश्वासन

अंमलबजावणीसाठी आणि प्रश्नाच्या सकारात्मक तोडग्यासाठी दिलेली संधी आहे. भारतीय मजदूर संघाने या बाबतीत त्रिपक्षीय बैठकीत सकारात्मक भूमिका न घेतल्यास या संस्थावर प्रशासक नेमण्यात यावा, व शासन मान्यता काढून घेऊन कामगारांना न्याय देण्यात यावेत. अशी ठाम निर्धार बाळासाहेब भुजबळ यांनी स्पष्ट केले आहेत सिंहगड संस्थेतील हजारो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे 20 महिन्यांहून अधिक काळाचे वेतन प्रलंबित असून, त्यामुळे अनेक कर्मचारी व त्यांच्या कुटुंबांवर गंभीर आर्थिक संकट ओढवले आहे. या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आतापर्यंत 13 कर्मचाऱ्यांनी आपले जीवन संपवल्याचा गंभीर आरोप भारतीय मजदूर संघाने केला आहे.

कर्मचारी गेल्या दोन महिन्यांहून अधिक काळ थकीत वेतन, पी.एफ. आणि इतर न्याय्य हक्कांसाठी आंदोलन व सत्याग्रह करीत आहेत. सन 2016 पासून पी.एफ. संदर्भातील अनियमितता, पात्र कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार संपूर्ण वेतनाचा लाभ, प्रलंबित 56 टक्के महागाई भत्ता तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन व वैध सेवा निवृत्ती लाभ हे प्रमुख प्रश्न असल्याचे संघटनेने म्हटले आहे. भारतीय मजदूर संघाने शासनाकडे 20 महिन्यांचे थकीत वेतन तातडीने अदा करण्यासह सर्व प्रलंबित आर्थिक व सेवा विषयक प्रश्नांवर कालबद्ध निर्णय घेण्याची मागणी केली आहे.

# दलित साहित्य ही समाजाची गरज

## ‘उर्गेन आर्ट फेस्टिवल’मध्ये ज्येष्ठ साहित्यिकांची भावना

■ करुणादीप फाउंडेशन आणि त्रिरत्न वैरोचना सेंटर आयोजित उर्गेन आर्ट फेस्टिवलचा समारोप

■ पुणे (दै. संध्या)

अस्पृश्यता ,जातीयता आणि त्यामधून माणसा माणसांमध्ये भेदाभेद आजही अस्तित्वात आहे . त्यामुळे दलित समाजाचे दुःख आणि वेदना आजही तसाच कायम आहेत. या वेदनेला फुंकर घालून दलित साहित्याने वास्तव मांडले . जातीयता संपवून सामाजिक सलोखा आणि समानता प्रस्थापित करण्यासाठी दलित साहित्याची आजही समाजाला गरज आहे अशी भावना ज्येष्ठ साहित्यिकांनी व्यक्त केली.

करुणादीप फाउंडेशन आणि त्रिरत्न वैरोचना सेंटर यांच्यातर्फे बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित करण्यात आलेल्या उर्गेन आर्ट फेस्टिवल मध्ये कलाकार परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये ज्येष्ठ साहित्यिक आणि विचारवंतांनी दलित साहित्य आणि त्याचा कलेशी असणारा संबंध त्यांचा संदर्भात चर्चा केली. पद्मश्री ग्रंवाग संपतेन, डॉ. विमलताई एस. थोरात, शाहीर संभाजी भगत आणि कवी नितीन चंदनशिवे या चर्चासत्रामध्ये सहभागी झाले होते.

डॉ. विमल थोरात म्हणाल्या, महाराष्ट्राने सर्वप्रथम दलित साहित्याला जन्म दिला.



आज हे दलित साहित्य संपूर्ण भारतामध्ये पसरले आहेत. भारताचे 22 भाषांपैकी 20 भाषांमध्ये सक्रिय लेखक दलितांचा संदर्भात लेखन करत आहेत. दलित साहित्य हे वेगवेगळ्या भाषांमध्ये भाषांतरित होणे गरजेचे आहे, शब्दशः नसले तरी त्याचा भावार्थ एका वर्षातून दुसऱ्या भाषेमध्ये पोहोचला तर त्यातून दलितांचे दुःखामध्ये समाजाच्या काळापर्यंत पोहोचू शकतात.

शाहीर संभाजी भगत म्हणाले, सत्तेच्या राजकारणापलीकडे एक सांस्कृतिक राजकारण अस्तित्वात आहे . सत्तेचे राजकारण काही क्षण असतात परंतु सांस्कृतिक राजकारण मात्र कायमस्वरूपी असते. दलितांचे दुःख आणि वेदना मांडण्यासाठी समांतर सांस्कृतिक राजकारण उभे करण्याची गरज आहे . मनुवादी आणि ब्राह्मण्यवादी विचारांमधून दलितांवर कायमच अन्याय होत आला आहे, तो जुगारून देण्यासाठी समतावादी, मानवतावादी समाज निर्माण करण्यासाठी दलित साहित्याने आवाज म्हणून त्यांचे दुःख समाजासमोर मांडले पाहिजे.

पद्मश्री ग्रंवाग संपतेन म्हणाले, तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील एकता ,समता बंधुता आणि न्याय यांचा समावेश असणारा समाज निर्माण होणे गरजेचे आहे . त्यासाठी दलित साहित्य हे अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. देश अखंडपणे समानतेच्या पायावर उभा राहिला तरच खऱ्या अर्थाने आपण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील भारत निर्माण झाला असे म्हणू शकतो. नितीन चंदनशिवे म्हणाले, कवितेच्या माध्यमातून वंचित आणि उपेक्षितांचे दुःख समस्या मांडले जात आहे ही मी माझे कवी म्हणून कामच समजतो. कोणत्याही कलाकाराला त्याची कला किंवा लेखक आणि कवीला मिळालेली लेखणी याला तेव्हाच खऱ्या अर्थाने महत्त्व प्राप्त होते जेव्हा तो कलाकार कवी अथवा लेखक सर्वसामान्यांचे दुःख जाणून ते आपल्या कलेच्या माध्यमातून समाजासमोर मांडतो . कलेच्या माध्यमातून किंवा लेखणीतून भलेही ते दुःख दूर होणार नाही परंतु ते मांडता येणे गरजेचे आहे आणि ही निर्भीडता प्रत्येक लेखक आणि कवी मध्ये असणे गरजेचे आहे. संतोष संखद यांनी सूत्रसंचालन केले. दिव्या शिंदे आणि डॉ. अस्मिता गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. डॉ. व्ही. बी. गायकवाड यांनी आभार मानले.



## ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स क्षेत्रात पुणे देशात अग्रेसर असणार

■ मॅग्नमच्या ग्लोबल बिझनेस सोल्युशन्स सेंटरचे वाकडमध्ये मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्‌घाटन

■ मॅग्नमच्या केंद्रातून एक हजारांहून अधिक रोजगार

■ कृत्रिम बुद्धिमत्ता, स्वयंचलित तंत्रज्ञान व लॉजिस्टिक्सचा वापर

■ पुणे (दै. संध्या)

ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्सचे (जीसीसी) प्रमुख केंद्र म्हणून पुणे वेगाने विकसित होत असून, पुण्यात आतापर्यंत 130 पेक्षा अधिक जीसीसी कार्यरत झाले आहेत. आगामी एका वर्षात ही संख्या 800 पेक्षा अधिक होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. जीसीसी क्षेत्रात पुण्याने देशात प्रथम क्रमांकाचे स्थान मिळवावे, हे राज्य शासनाचे लक्ष्य असल्याचेही त्यांनी सांगितले.

वाकड येथील ईओएन वेस्ट आयटी पार्कमध्ये मॅग्नम आईस्क्रीम कंपनीच्या ग्लोबल बिझनेस सोल्युशन्स सेंटरच्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला आमदार अमित गोरखे, शंकर जगताप, उद्योग, गुंतवणूक व सेवा विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अनबळगन, मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक व धोरण सल्लागार कौस्तुभ धवसे, मॅग्नम आईस्क्रीम कंपनीचे मुख्य वित्तीय अधिकारी अभिजीत भट्टाचार्य, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त विजय सूर्यवंशी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्यासह उद्योजक आणि कंपनीचे अधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्र हे ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्ससाठी देशातील प्रमुख आणि पसंतीचे गुंतवणूक केंद्र बनले असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री म्हणाले, पुण्यात जागतिक कंपन्यांकडून ग्लोबल व्यवसाय सेवा केंद्रे सुरू करण्याला मिळणारा प्रतिसाद हा शहरातील उद्योगपूरक वातावरण आणि उपलब्ध कुशल मनुष्यबळाची पावती आहे. मॅग्नमचे पुण्यातील केंद्र एक हजारांहून अधिक रोजगाराच्या संधी निर्माण करणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



## गणेशोत्सवासाठी गणेशमूर्तींवर अखेरचा हात फिरवण्याची लगबग

**राजगुरूनगर : दैनिक संध्या**

अवघ्या काही दिवसावर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेशमूर्तींवर अखेरचा हात फिरवण्याची लगबग मूर्तिकारांकडून सुरू झाली असल्याचे चित्र राजगुरुनगर परिसरात दिसत आहे.. महागाईची झळ बसूनही गणेशमूर्तींना यंदाही मागणी कायम असल्याचे मूर्तिकार सांगत आहे. राजगुरूनगर येथील कुंभारवाड्यातील पारंपरिक कुंभार समाजातील कारागीर बरोबर इतर मूर्तिकार गणेशमूर्तींचे काम अंतिम टप्प्यात नेण्यासाठी दिवस-रात्र मेहनत घेत आहेत. आकर्षक रंगकाम, सजावट आणि मूर्तींना अंतिम रूप देण्याचे काम सध्या वेगाने सुरू आहे. गणेशोत्सव काही दिवसांवर आल्याने विविध आकारांच्या गणेशमूर्तींना मागणी वाढली असून,एक ते दीड फुटापर्यंत मागणी जास्त असल्याचे मूर्तिकार सांगत आहे. दगडू शेठ,लालबाग,आणि नवीन टेन्ट मध्ये बेबी डॉल मूर्तींना अधिक मागणी असल्याने ग्राहकांच्या पसंतीनुसार मूर्ती तयार करून देण्यासाठी कारागीर अहोरात्र झटत आहेत. मूर्ती साच्यातून काढण्यापासून त्यास रंगसंगती,फिनिशिंग, सजावट करून मूर्ती पूर्णत्वास नेण्याचे काम रात्रदिवस सुरू आहे.पर्यावरणाच्या दृष्टीने शाडूच्या लहान मूर्तींना मागणी दिसून येत आहे. काही कारागीर गणेश मूर्ती साठी प्रसिद्ध असलेल्या पेण येथून कच्च्या मूर्ती आणून व रंगसंगतीने मूर्तीमध्ये जिवंतपणा आणण्याचे काम करत आहे. वाढलेल्या कच्च्या मालाच्या किमती, रंग, सजावटीचे साहित्य तसेच मजुरीमुळे खर्च वाढला असला तरी गणेशभक्तांचा उत्साह कायम असल्याचे मूर्तिकार आनंदा कुंभार व हरीश कुंभार सांगितले. राजगुरुनगर येथील कुंभारवाड्यातील मूर्तिकारांनी आजही आपला पारंपरिक व्यवसाय जपत गणेशमूर्ती घडविण्याची कला जोपासली आहे. मात्र, वाढती महागाई, मनुष्यबळाचा अभाव आणि नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने तरुणाईचा पारंपरिक व्यवसायाकडे होत असलेला दुर्लक्ष यामुळे या कलेसमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे. पूर्वी कुंभारवाड्यातील अनेक कुटुंबे गणेशमूर्ती घडविण्याच्या व्यवसायात सक्रिय होती. मात्र, बदलत्या काळानुसार तरुण पिढीने नोकरी व इतर व्यवसायांकडे वळण्यास सुरुवात केल्याने या पारंपरिक व्यवसायात काम करणाऱ्या कारागिरांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यामुळे सध्या बोटावर मोजण्याइतकेच मूर्तिकार हा व्यवसाय पुढे नेत आहेत.

## शिक्षक समितीच्या वतीने येत्या रविवारी सांगोला येथे शिक्षण हक्क परिषद

**जुन्नर : दैनिक संध्या**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या वतीने रविवार दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १ वाजता शिक्षण हक्क परिषदेचे आयोजन करण्यात आले असून महाराष्ट्रातील नामवंत शिक्षणतज्ज्ञ भाऊ चासकर, अकोले यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या पुणे विभागातील संघटना पदाधिकारी व कार्यकर्त्यांसाठी सकाळी १० ते १ यावेळेत कार्यकर्ता उद्बोधन शिबिर आयोजित करण्यात आले आहे. मुक्ताई लॉन्स, कडलास रोड, सांगोला या ठिकाणी संपन्न होणाऱ्या या कार्यशाळेत शिक्षक समितीचे राज्यनेते उदय शिंदे, सातारा, राज्याध्यक्ष विजय कोंबे, वर्धा, महासचिव राजन कोरगांवकर, सिंधुदुर्ग, राज्य महिला आघाडी प्रमुख वर्षा केनवडे, राज्य उपाध्यक्ष राजन सावंत, सोलापूर, आनंदा कांदळकर, नाशिक, विलास कंटेकुरे, धाराशिव, कार्याध्यक्ष सयाजीराव पाटील, सांगली, कोषाध्यक्ष नंदकुमार होळकर, पुणे, विभागीय अध्यक्ष अर्जुन पाटील, कोल्हापूर यांच्यासह राज्यभरातील शिक्षक समितीचे पदाधिकारी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत प्रचलित टीईटी परीक्षेमध्ये कोणते संरचनात्मक बदल करून सेवेतील शिक्षकांना न्याय देता येईल या अनुषंगाने आपली भूमिका मांडणार आहेत. त्याचबरोबर शिक्षक समितीचे माजी राज्य संपर्कप्रमुख सुरेश पवार यांच्या लेखणीतून शब्दबद्ध झालेल्या चक्रव्यूहात शिक्षण या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. मान्यवर पदाधिकारी उपस्थित राहून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत.याशिवाय दुसऱ्या सत्रात महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेल्या विदारक स्थितीवर चिंतन व्हावे या उद्देशाने दुपारी १ वाजता शिक्षण हक्क परिषद आयोजित करण्यात आली असून ही परिषद सर्वांसाठी खुली आहे. या परिषदेचे उदघाट्न सांगोल्याचे आमदार आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या हस्ते होणार असून महाराष्ट्रातील नामवंत शिक्षणतज्ज्ञ भाऊ चासकर हे शिक्षण हक्काचं काय झालं? या विषयावर व्याख्यान देणार आहेत.



## बाजार समितीच्या उपसभापतीपदी नानासाहेब आंबनावे यांची बिनविरोध निवड

**कोरेगावमुळ : दैनिक संध्या**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापतीपदी नानासाहेब आंबनावे यांची बिनविरोध निवड झाली. उपसभापतीपदासाठी आंबनावे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी प्रकाश जगताप यांनी त्यांच्या बिनविरोध निवडीची घोषणा केली. माजी उपसभापती मनीषा हरपळे यांनी पदाचा राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या उपसभापतीपदासाठी ही निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली. एकमेव अर्ज दाखल झाल्याने निवडणूक चुरस न होता आंबनावे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रकाश जगताप, माजी सभापती दिलीप काळभोर तसेच संचालक राजाराम कांचन, गणेश घुले, प्रशांत काळभोर, नितीन दांगट, दत्तात्रय पायगुडे, सुदर्शन चौधरी, लक्ष्मण केसकर, सारिका हरगुडे, मनीषा हरपळे, रविंद्र कंद आणि संतोष नांगरे यासह माहिती सेवा समितीचे संस्थापक चंद्रकांत वारघडे, ईश्वर गाडुते, मिलिंद हरगुडे, संदेश आव्हाळे, राजेंद्र खांदवे, नवनाथ काकडे, कुंडलिक थोरात आदी उपस्थित होते. उपसभापतीपदाच्या निवडीचा ठराव संतोष नांगरे यांनी मांडला, तर शशिकांत गायकवाड यांनी अनुमोदन दिले. यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी प्रकाश जगताप यांनी नानासाहेब आंबनावे यांची उपसभापतीपदी बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले. बिनविरोध निवडीमुळे बाजार समितीच्या संचालक मंडळातील एकजूट आणि परस्पर समन्वयाचे चित्र दिसून आले असून, आगामी काळात बाजार समितीच्या विकासाला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# मनपा कंत्राटी कामगारांना बोनस देण्याबाबत प्रशासन सकारात्मक

■ पुणे (दै. संध्या)

पुणे महानगरपालिकेत कार्यरत सुमारे साडेदहा हजार कंत्राटी कामगारांना बोनस देण्याबाबत मनपा प्रशासन सकारात्मक असल्याचे आश्वासन अतिरिक्त आयुक्त प्राजित नायर यांनी दिले.

पुणे महानगरपालिकेतील कंत्राटी कामगारांना यापूर्वी त्यांच्या मासिक वेतनामध्ये बोनसची रक्कम देण्यात येत होती. मात्र, Payment of Bonus Act मधील तरतुदीनुसार ज्या कामगारांचे वेतन २१ हजार रुपयांपेक्षा अधिक आहे, त्यांना बोनस देता येणार नाही, असा निर्णय मनपा प्रशासनाने नुकताच घेतला होता. या निर्णयामुळे कंत्राटी कामगारांमध्ये नाराजी निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर कामगार नेते व नगरसेवक सुनील शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय मजदूर संघाच्या शिष्टमंडळाने अतिरिक्त आयुक्त प्राजित नायर यांची भेट घेऊन निवेदन साद केले. यावेळी कंत्राटी कामगारांच्या बोनसचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची मागणी करण्यात आली. यावर प्रशासनाने कंत्राटी कामगारांच्या वेतनातून बोनसच्या मूळ रकमेची कपात करण्याबाबत देण्यात आलेले आदेश मागे घेतल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त नायर यांनी दिली.

तसेच, कंत्राटी कामगारांना यापुढेही बोनस देता येईल का, याबाबत विधी विभागाचा सल्ला घेऊन सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, राष्ट्रीय सणांच्या सुट्टीच्या दिवशी काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांना नियमानुसार दुहेरी वेतन तसेच अतिरिक्त पगार देण्याचा मुद्दाही शिष्टमंडळाने प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिला. गेल्या वर्षभरात कोणत्याही कंत्राटदाराने संबंधित कामगारांना या सुविधांचा लाभ दिलेला नसल्याचा दावा शिष्टमंडळाने केला.

या प्रकरणाची प्रशासनामार्फत तपासणी करून लवकरच योग्य



निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन अतिरिक्त आयुक्त प्राजित नायर यांनी दिले. कंत्राटी कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी राष्ट्रीय मजदूर संघ सातत्याने पाठपुरावा करीत असून, प्रशासनाने बोनसच्या प्रश्नावर सकारात्मक भूमिका घेतल्याने कामगारांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी राष्ट्रीय मजदूर संघाचे उपाध्यक्ष सीताराम चव्हाण यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सहकारी परिषदेच्या पूर्वतयारीची बैठक संपन्न




■ मुंबई(दै. संध्या)

मुंबई काँग्रेस सहकारी कक्षातर्फे आयोजित होणाऱ्या आगामी सहकारी परिषदेच्या पूर्वतयारीसंदर्भात एक महत्त्वाची बैठक सहकारी कक्षाचे अध्यक्ष श्री यशवंत (भाई) सावंत यांच्या अध्यक्षतेखाली आणि मार्गदर्शनाखाली उत्साहाच्या वातावरणात पार पडली.

याप्रसंगी बोलताना श्री यशवंत (भाई) सावंत म्हणाले, "मुंबईतील सहकारी क्षेत्र हे सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनाशी थेट जोडलेले आहे. सहकारी संस्था आणि सदस्यांच्या समस्या सोडवण्यासाठी काँग्रेस सहकारी कक्ष त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील." त्यांनी विश्वास व्यक्त केला की, आगामी सहकारी परिषद केवळ एक औपचारिक कार्यक्रम न राहता, सहकारी क्षेत्राच्या समस्यांना दिशा देण्यासाठी एक प्रभावी व्यासपीठ बनेल. या बैठकीत सहकारी परिषदेची चौकट आणि नियोजन, मुंबईतील सहकारी संस्था आणि सदस्यांचा व्यापक सहभाग, सहकारी क्षेत्रातील विविध प्रलंबित प्रश्न आणि आगामी संघटनात्मक कार्यक्रमांवर सविस्तर चर्चा झाली. श्री. श्रीनिवास देवरुखकर यांनी परिषदेच्या तयारीमध्ये विविध स्तरांवरील व्यापक जनसंपर्क आणि संघटनात्मक नियोजनाच्या भूमिकेवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, "आम्ही काँग्रेसच्या माध्यमातून सहकारी क्षेत्रातील प्रत्येक घटकाचा आवाज उठवून त्यांच्या कायदेशीर हक्कांसाठी प्रभावीपणे लढा देऊ आणि त्यांचे समर्थन करू." सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एक भव्य आणि यशस्वी सहकारी परिषद सुनिश्चित करण्यासाठी एकत्र काम करण्याची शपथ घेतली. या बैठकीदरम्यान, श्री. अब्दुल कादर यांची मुंबई शहर कार्यकारी अध्यक्ष, श्री. अरुण वशिर्दे यांची मुंबई शहर प्रभारी, श्री. किशोर शिंदे यांची मुंबई उपाध्यक्ष, श्री. केनेथ मिस्किटा यांची मुंबई पश्चिम उपनगर कार्यकारी अध्यक्ष, श्री. रवींद्र निकळे यांची प्रभारी आणि श्री. सोमनाथ चौधरी यांची दक्षिण मुंबई उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. या कार्यक्रमाला मुंबई काँग्रेसचे नेते श्री.भवरसिंग राजपुरोहित, दक्षिण मुंबई जिल्हाध्यक्ष श्री. रवी बावकर, सेलचे सल्लागार श्री. भारदस्कर, उपाध्यक्ष श्री. संजय सावंत, श्री. दिलीप खान्देशी, श्री. बालमुकुंद गुप्ता, व श्री. दीनानाथ पाटकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# चैत्यभूमी ते इंदूमिलपर्यंतच्या रस्ता रुंदीकरणाचे अंदाजपत्रक तयार करा



■ मुंबई(दै. संध्या)

दादर येथील चैत्यभूमीपासून इंदूमिलपर्यंत जाणाऱ्या विद्यमान रस्त्याच्या रुंदीकरणाचे अंदाजपत्रक तातडीने तयार करावे. रस्त्याच्या जागेच्या हस्तांतरण प्रक्रियेसाठी महसूल विभाग तसेच एमएमआरडीएचे अभिप्राय तत्काळ मिळविण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने पाठपुरावा करावा, अशा सूचना विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिल्या. विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी अशोकस्तंभ ते चैत्यभूमी मुख्य स्तूप या विद्यमान रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामाच्या सद्य:स्थितीचा आढावा घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते येत्या ६ डिसेंबर रोजी या रस्ता रुंदीकरणाच्या कामाचे उद्घाटन करण्याचे नियोजन असून, त्या अनुषंगाने संबंधित सर्व विभागांनी समन्वय साधून याबाबत पाठपुरावा करावा. रुंदीकरणासाठी आवश्यक जागेचे प्रस्ताव ऑफलाइन तसेच ऑनलाइन पद्धतीने पाठवून संबंधितांनी प्रत्यक्ष जाऊन यासंदर्भातील कार्यवाही पूर्ण करावी. सध्याच्या रस्त्याच्या समुद्राकडील बाजूची जमीन बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरित करणे आणि चैत्यभूमीपासून जी/उत्तर विभागातील इंदूमिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रस्तावित भव्य स्मारकाला जोडल्यामुळे लाखो अनुयायांना याचा फायदा होईल. इंदूमिलपर्यंत रस्ता तयार करण्यासह रस्त्यालगतच्या परिसराचे सुशोभीकरण करणे, याबाबतही या बैठकीत चर्चा करण्यात आली. महसूल विभाग, पर्यावरण विभाग, मुंबई महानगरपालिका प्रशासन आणि एमएमआरडीएने या रस्त्याच्या उभारणीसाठी सकारात्मक कार्यवाही करावी. या कामाच्या प्रगतीचा आढावा पुढील महिन्यात संबंधित विभागांकडून घेण्यात येईल, असेही उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी यावेळी सांगितले. यावेळी मुंबई महानगरपालिका, एमएमआरडीए, महसूल विभागाचे प्रशासकीय अधिकारी व चैत्यभूमी व्यवस्थापक समिती पदाधिकारी उपस्थित होते.



## गणपती आगमन व विसर्जन मिरवणूक मार्गाची पाहणी

■ राजगुरुनगर (दै. संध्या)

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणपती आगमन व विसर्जन मिरवणूक मार्गाची प्रशासनाकडून पाहणी करण्यात आली. मिरवणुकीदरम्यान कोणताही अडथळा न येता मिरवणूक सुरळीत, सुरक्षित आणि शांततेत पार पडावी यासाठी खेड पोलिस, नगरपरिषद, बांधकाम विभाग व विद्युत विभागाच्या अधिकाऱ्यांकडून पाहणी करण्यात आली. राजगुरुनगर शहरात अनेक छोटी मोठी सार्वजनिक गणेश मंडळे असून मिरवणुकी दरम्यान गणेश भक्ताची गर्दी पाहता मिरवणूक मार्गावरील रस्त्यांची स्थिती, वाहतुकीची व्यवस्था, विद्युत तारांची उंची व सुरक्षितता याकडे विशेष लक्ष देण्याच्या सूचना देण्यात आल्या. उपविभागीय अधिकारी अमोल मांडवे ,मुख्याधिकारी अंबादास गरकळ, पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण, सहाय्यक अभियंता एस.व्यंकटेश,नायब तहसीलदार चेतन मोरे, नायब तहसीलदार रविंद्र मोरे, बांधकाम विभागाचे नितीन दाणे,जाधव साहेब ,पोलिस हवालदार सुनील बांडे नगरपरिषद कर्मचारी संदेश कुंभार आदीं उपस्थित होते. आगमन मिरवणुकीदरम्यान गणेशभक्तांची मोठी गर्दी होत असल्याने रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजविणे तसेच धोकादायक किंवा खाली आलेल्या वायर व्यवस्थित करण्याच्या सूचना संबंधित विभागाला देण्यात आली. प्रत्येक गणेश मंडळासमोर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची व्यवस्था करण्याच्या सूचनाही देण्यात आले. सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक माहिती उपलब्ध व्हावी, यासाठी सीसीटीव्ही व्यवस्था महत्त्वाची ठरणारअसून उत्सव शांततेत व उत्साहात पार पाडण्यासाठी पोलिस प्रशासनाकडून विशेष नियोजन करण्यात येत आहे.या अनुषंगाने शुक्रवारी तहसीलदार कार्यालय येथे गणेशोत्सव नियोजनासाठी शहरातील गणेश मंडळांचे पदाधिकारी आणि विविध विभागातील प्रशासन यांच्यात समन्वय बैठक आयोजित करण्यात आली आहे.


## लक्ष्मण विठुजी पा. थोरवे ग्रा. बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या..

मु.पो.शिरोली बु।।, ता. जुन्नर, जि. पुणे.
रजि. क्र. पीएनए/जेएनआर/आरएसआर/सीआर/३०७१/सन २००८/०९

**वार्षिक सर्वसाधारण सभेचे सूचनापत्र**

**(फक्त सभासदांकरीता)**

लक्ष्मण विठुजी पा. थोरवे ग्रा.बि.शेती सहकारी पतसंस्था मर्यादित, शिरोली बु।।, ता. जुन्नर, जि. पुणे या संस्थेची सन २०२५-२०२६ या वर्षांची १८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार, दि.१६/०९/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा. "पतसंस्था कार्यालय "शिरोली बु।।. येथे संस्थेचे चेअरमन मा. श्री. ॲड . अविनाश विठ्ठलराव थोरवे यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचार करण्यासाठी घेण्याचे ठरविण्यात आले आहे, तरी सदर सभेमध्ये आपण सहभाग घ्यावे अशी विनंती आहे.

**सभेपुढील विषय**

१. दिनांक २१/०९/२०२५ रोजी झालेल्या १७ वी वार्षिक सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२. संचालक मंडळाचे संस्थेचे कार्याबद्दलच्या सन२०२५-२०२६ च्या वार्षिक अहवालावर विचार करणे. व ती स्विकृत करणे.
३. सन २०२५-२०२६ वैधानिक लेखापरिक्षण झालेल्या ताळेबंद व नफा-तोटा पत्रक यावर विचार करणे व तो स्विकृत करणे.
४. सन २०२५-२०२६ चे वैधानिक लेखापरिक्षकांचे लेखापरिक्षण अहवालावर विचार करणे व तो स्विकृत करणे.
५. सन २०२४-२०२५ चे लेखापरिक्षक अहवालाचे दोष दुरुस्ती अहवाल व त्यावरील निबंधकाचे निर्देश सादर करणे.
६. कायदा व नियमांस अनुसरून माननीय संचालक मंडळाने मंजुर केलेले सन २०२५-२६ च्या नफा वाटणीस लाभांश दरास मान्यता देणे.
७. सभासदत्व रद्द करण्यासाठी आलेल्या अर्जावर घेतलेल्या निर्णयांची माहिती देणे.
८. संस्थेचे सन २०२५-२०२६ व २०२६-२७ करिता तयार केलेल्या उत्पन्न /महसुल खर्चाचे अंदांज पत्रकास मान्यता देणे,
९. संस्थेचे सन २०२५-२६ या वर्षाच्या मान्य अंदाजपत्रक तरतुदीपेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे,
१०. सन २०२६-२७ वैधानिक लेखापरिक्षणासाठी लेखापरिक्षकाची नेमणुक करणे त्यांच्या मानधनास मंजूरी देणे.
११. संचालक मंडळ व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना व येणे कर्जाची कायदा कलम ७५ (२) (१) नुसार माहिती देणे.
१२. संस्थेचे समायोजने बाबत विचार विनिमय करणे.
१३. सन २०२६-२७ करिता सभासद सेवक प्रशिक्षण, कर्ज, गुंतवणूक, कर्ज वसुली इ. तत्सम विषंयाबाबतच्या वार्षिक धोरणास मान्यता देणे.
१४. वार्षिक सर्व साधारण सभेसाठी अनुपस्थित सभासदांची रजा क्षमापित करण्याबाबत निर्णय घेणे.
१५. मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

दिनांक : ०१/०९/२०२६ वार मंगळवार
ठिकाण : शिरोली बु।।

डॉ. श्री. राजाराम लक्ष्मण थोरवे
सचिव
मा. संचालक मंडळाच्या आज्ञेवरून

सूचना : १) गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास सभेचे कामकाज त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सुरु होईल. व या सभेस गणसंख्या पूर्तीची आवश्यकता असणार नाही. २) अहवालासंबंधी सभासदांना काही सूचना करावयाच्या असल्यास त्यांनी त्या सभेपूर्वी किमान ४ दिवस आधी संस्थेच्या कार्यालयात लेखी द्याव्यात. ३) ऐनवेळी आलेल्या सूचनांचा विचार केला जाणार नाही. ४) सभेस येताना प्रत बरोबर आणावी.

## थोडक्यात पण महत्वाचे



## मराठा सेवा संघाचा वर्धापन दिन पिंपरी चिंचवड शहरात उत्साहात संपन्न

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी : मराठा सेवा संघ गेली छत्तीस वर्षे राष्ट्रमाता जिजाऊंना आदर्श मानून शिव,शाहू,फुले, आंबेडकरांच्या विचाराने कार्य करत आहे.मराठा समाजाच्या विविध मागण्यांचा पाठपुरावा करत असताना मराठा समाजास न्याय मिळावा तसेच इतर समाजावर अन्याय होणार नाही व सामाजिक सलोखा जोपासण्यासाठी पूर्वी प्रमाणेच पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कार्यरत रहावे असे प्रतिपादन मराठा सेवा संघाचे पुणे विभागीय अध्यक्ष प्राचार्य रामकिशन पवार यांनी केले. मराठा सेवा संघाचा छत्तीसावा वर्धापन दिन मंगळवार दिनांक एक रोजी निगडी येथील संघाच्या कार्यालयात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरवात मान्यवरांच्या हस्ते जिजाऊ पूजन करून करण्यात आली. जिजाऊ ब्रिगेडच्या शहराध्यक्षा सुलभा यादव यांनी जिजाऊ वंदना म्हणटली प्रास्ताविक प्रकाश जाधव यांनी केले यावेळेस सामाजिक कार्यकर्ते मारूती भापकर,अभिमन्यू पवार, अर्जुन खामकर, सुनिल जाधव यांनी मनोगते व्यक्त केली अध्यक्षीय भाषण शहराध्यक्ष आबासाहेब ढवळे यांनी केले सूत्रसंचालन संभाजी ब्रिगेड शहराध्यक्ष प्रविण कदम यांनी केले या प्रसंगी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सेवानिवृत्त मुख्य अभियंता मकरंद निकम, सामाजिक संभाजी ब्रिगेड शहराध्यक्ष सतिश काळे, वसंतराव पाटील, संपतराव जगताप, शंकरराव सावंत यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.आभार साहेबराव साळुंखे यांनी मानले.

## वाहतूक कोंडी, पाणीटंचाई व नागरी समस्यांवर तत्काळ उपाययोजना करा

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी-चिंचवड शहरातील वाढती वाहतूक कोंडी, अपुरा व असमान पाणीपुरवठा, बीआरटी मार्गांची झालेली दुरवस्था, पवना नदीचे प्रदूषण आणि अनधिकृत बांधकामांमुळे रखडलेले रस्ते यांसारख्या विविध गंभीर नागरी समस्यांवर तत्काळ उपाययोजना करण्याचे आदेश मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी महापालिका प्रशासनाला दिले. शहरातील विविध प्रश्नांबाबत खासदार बारणे यांनी गुरुवारी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याबरोबर आढावा बैठक घेतली. त्यांनी शहराच्या विविध प्रश्नांचा सविस्तर आढावा घेत तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. या बैठकीस शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, नगरसेवक निलेश तरस, ऐश्वर्या तरस, राजेंद्र तरस, बापू कातळे, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, सह आयुक्त मनोज लोणकर, नगररचना विभागाचे उपसंचालक ललित खोब्रागडे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, पाणीपुरवठा विभागाचे सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी, उपायुक्त अण्णा बोदडे, सहायक आयुक्त मुकेश कोळप यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. खासदार बारणे म्हणाले, शहरातील प्रमुख चौकांमध्ये दररोज होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक व वाहनचालक त्रस्त आहेत. अतिक्रमणे, अनधिकृत विक्रेते आणि बेशिस्त पार्किंगमुळे ट्रॅफिक जामची समस्या गंभीर बनली आहे. तासनतास लोकांना एकाच चौकात अडकून राहावे लागते. यासंदर्भात पोलीस आयुक्तांसोबत स्वतंत्र बैठक घेऊन ज्या चौकांत सर्वाधिक कोंडी होते, तिथे तातडीने सूक्ष्म नियोजन करावे. पोलीस व पालिकेने परस्पर समन्वय साधून नागरिकांची या त्रासातून मुक्तता करावी. संध्याकाळच्या वेळी शहरात येणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्स बसेससाठी शहराबाहेर वेगळी पार्किंग व्यवस्था करावी, जेणेकरून मुख्य रस्त्यांवर वाहतुकीचा खोळंबा होणार नाही. यासाठी ट्रॅव्हल्स/बस संघटनांसोबत बैठक घेऊन तोडगा काढण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत शहरात किती सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आणि त्यातील प्रत्यक्ष किती चालू आहेत, याचा ठोस हिशोब प्रशासनाकडे नाही. या कामाची सखोल तपासणी करून तातडीने 'थर्ड पार्टी ऑडिट' करावे. सुरक्षेच्या दृष्टीने शहरातील सर्व सीसीटीव्ही कॅमेरे २४ तास कार्यरत राहतील याची दक्षता घेण्याचे आदेश बारणे यांनी दिले. आऊटर रिंगरोडच्या कामाच्या पार्श्वभूमीवर पीएमआरडीए आयुक्त व पालिका प्रशासनाने संयुक्त बैठक घ्यावी. शहराच्या लगतच्या सीमांवर बाहेरून येणाऱ्या व जाणाऱ्या प्रवाशांसाठी बस टर्मिनल्ससाठी जागा उपलब्ध करून ठेवावी, जेणेकरून शहरांतर्गत रस्त्यांवरील वाहतुकीचा ताण कमी होईल, असेही बारणे यांनी स्पष्ट केले.

## दिशा-कृतीदर्शक प्रशिक्षण शिबिराद्वारे काँग्रेसची सक्रिय सुरुवात

**पिंपरी : दैनिक संध्या**

संघटन सृजन अभियान अंतर्गत नव्याने महाराष्ट्रात नेमलेल्या 70 संघटनात्मक जिल्हाध्यक्षांच्या दहा दिवसीय प्रशिक्षणाचा कार्यक्रम नुकताच ग्रेप रिसॉर्ट, गंगापूर, नाशिक येथे संपन्न झाला. दि. 24 ऑगस्ट 2026 ते 02 सप्टेंबर 2026 या 10 दिवशीय जिल्हाध्यक्षांच्या निवासी शिबिरामध्ये राजकारण, काँग्रेस विचारधारा, सर्वोदय मार्ग, तळागाळातील संपर्क कृती आराखडा, जातिव्यवस्था आणि आरक्षण, थेट गाव भेट राहता माहिती दौरा, काँग्रेसचा इतिहास, सांस्कृतिक राजकारण, भाषेचे राजकारण, लिंग भाव, आर्थिक प्रश्न, शहरी राजकारण, प्रशिक्षण प्रभाव, संघटन बांधणी, फेसिझम बहुसंख्यांकवाद, धर्मनिरपेक्षता, विकसित भारत वास्तव, नवनिर्माण कृती आराखडा, प्रत्यक्ष खड्डे खोदून जलसंवर्धन उपक्रम, या सर्व विषया बाबतीमध्ये तज्ञांचे मार्गदर्शन दिशादर्शक कार्यक्रम आणि सखोल माहिती देण्यात आली. प्रत्यक्ष गाव भेट दौऱ्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे अनुभव आल्याचे जिल्हाध्यक्षांनी एकत्रित संवादामध्ये सादरीकरण केले, प्रत्यक्ष थेट खड्डे खोदण्याच्या मनरेगा योजना प्रत्यक्ष कृतीतून दर्शवण्यात आली. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या प्रशिक्षण विभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामध्ये सचिन राव, खासदार एस् सेंथिल, उल्हास पवार, उल्का महाजन, दीपक पवार, दीपा पवार, डॉ.नीरज हत्तेकर, वामशी रेड्डी, समीर शेख, लोकेश शेवडे, विश्वजीत कदम, पृथ्वीराज चव्हाण, सतेज पाटील, के राजू, विजय इंदर सिंगला, विजय वडेट्टीवार, के कन्नन आणि हर्षवर्धन सपकाळ यांनी शिबिरार्थींना मार्गदर्शन केले. प्रशिक्षण शिबिराच्या शेवटच्या दिवशी राहुलजी गांधी सर्व जिल्हाध्यक्षांच्या कुटुंबीयांसमवेत स्नेहभेट घेतली नंतर त्यांनी जागतिक राजकारण आणि भारत या विषयावर स्वतः दोन तास संवाद शिबिरार्थींशी संवाद साधला, स्व – सुदृढता मानसिक स्थैर्य, लक्ष, ध्यान यांचा परस्पर संबंध दर्शवत मार्गदर्शन केले. एकंदरीतच नवनिर्माणातून परिवर्तन असा संदेश देत शिबिर संपन्न झाले. पिंपरी-चिंचवड शहरातून काँग्रेसचे शहराध्यक्ष नरेंद्र बनसोडे हे दहा दिवस या शिबिरात सहभागी झाले आणि शिबिराच्या शेवटच्या दिवशी कुटुंबीयासह त्यांनी राहुल गांधी यांची भेटही घेतली. याबाबत सांगताना बनसोडे म्हणाले, नवा संकल्प, "नवी दिशा- दृष्टी, नवे मार्ग, कृती कार्यक्रम, प्रशिक्षणातून कृतीकडे नेणारे हे शिबिर अत्यंत यशस्वी झाले आणि निश्चित त्याचा परिणाम येणाऱ्या काळात सर्व जिल्ह्यांमधून संघटना बांधणी, निवडणूक तयारी आणि जन्म माणसांचे प्रश्न सोडविने या त्रिसूत्रीतून दिसून येईल, काँग्रेसची ध्येय-धोरणे व विचारधारा, कार्यकर्त्यांची विचार आचार व व्यवहार संस्कृती, जनतेशी संवादाची पद्धत, पक्षाची संघटनात्मक कार्यपद्धती, बूथ ते शहर पातळीवरील कृती आराखडा, पुढील 3/6 महिन्यांचे लक्ष्य निश्चिती, कार्यकर्त्यांचे अनुभव व सूचना हे सर्व शिकावयास मिळाले" असे बनसोडे यांनी सांगितले.

# कासारवाडी, फुगेवाडीतील नागरिकांची गैरसोय दूर होणार

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी - कासारवाडी आणि फुगेवाडी येथील रेल्वे फाटक बंद करण्याच्या प्रशासकीय हालचाली सुरू असताना स्थानिक नागरिकांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी खासदार श्रीरंग बारणे यांनी अधिकाऱ्यांसह प्रत्यक्ष जागेची पाहणी केली. कासारवाडी येथील रेल्वे फाटकाच्या जागेवर भुयारी मार्ग तयार करण्याबाबत रेल्वे व महापालिका अधिकाऱ्यांना सूचना त्यांनी दिल्या आहेत.

कासारवाडी येथील पाहणीवेळी रेल्वे विभागाचे शुभम निकम, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सहशहर अभियंता प्रेरणा शिनकर, कार्यकारी अभियंता विजय भोजने, नगरसेविका मनीषा लांडे, प्रतीक्षा जवळकर, माजी नगरसेवक शाम लांडे, प्रकाश जवळकर, दत्तोबा लांडगे, किरण मोटे, देवदत्त लांडे, सागर पाचारणे, निलेश लांडे तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते. फुगेवाडीतील पाहणीवेळी नगरसेवक राजू बनसोडे, माजी नगरसेविका उषा वाखारे, युवासेना जिल्हाप्रमुख सागर पाचरणे, शिवसेना पिंपरी-चिंचवड शहर संघटक निलेश हाके, मनोज वाखारे, यशवंत वाखारे तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

खासदार बारणे म्हणाले, कासारवाडी गावाचे रेल्वे लाईनमुळे दोन भाग झाले आहेत. स्मशानभूमी आणि शाळा दुसऱ्या बाजूला असल्याने नागरिकांसह शाळकरी विद्यार्थ्यांना ये-जा करताना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते.

नागरिकांची ही समस्या लक्षात घेऊन पाहणी केली. फुगेवाडी येथेही स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी प्रस्तावित अंडरपासच्या कामाची पाहणी करण्यात आली. हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जोपर्यंत अंडरपासचे काम पूर्ण होत नाही, तोपर्यंत नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून रेल्वे प्रशासनाने सहकार्य करावे, अशी विनंतीही करण्यात आली. या दोन्ही कामांमुळे कासरवाडी आणि फुगेवाडी परिसरातील नागरिकांचा व रहिवाशांचा ये-जा करण्याचा मार्ग सुकर होणार असल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले.



## शंकर जगताप यांच्याकडून रावेत, किवळे मामुर्डीकरांच्या समस्यांचे 'फास्ट ट्रॅक' निराकरण

■ पिंपरी (दै. संध्या)

नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्यांचे प्रशासनाच्या माध्यमातून जलदगतीने निराकरण करण्यासाठी चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या 'आमदार आपल्या दारी' उपक्रमाला रावेत, किवळे आणि मामुर्डी परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रावेत येथील (दि. 3) समीर लॉन्समध्ये झालेल्या या जनसंवाद कार्यक्रमात आमदार जगताप यांनी ७१५ नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकून घेत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. यावेळी नागरिकांच्या विविध समस्यांचा जागीच निपटारा करण्यात आला.



'आमदार आपल्या दारी' उपक्रमासाठी स्थायी समिती अध्यक्ष अभिषेक बारणे, नगरसेवक धर्मपाल तंतरपाळे, तहसीलदार जयराज देशमुख, उपायुक्त राजेश आगळे, प्रदीप ठेंगल, नायब तहसीलदार रवींद्र कुलकर्णी, अन्नधान्य वितरण अधिकारी (परिमंडळ अ) डॉ. विजयकुमार क्षीरसागर, संजय गांधी निराधार योजनेचे नायब तहसीलदार रवींद्र कुलकर्णी, 'ज ' प्रभाग क्षेत्रीय अधिकारी अश्विनी गायकवाड, मनपा कार्यकारी अभियंता सुनील पवार, कार्यकारी अभियंता सुनील शिंदे, संध्या वाघ, 'महावितरणचे सहाय्यक अभियंता रत्नदीप काळे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता नितीन महाजन, सहाय्यक निवडणूक अधिकारी वैशाली शिंदे, रावेत पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक संदीप देशमुख, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लिंभोरे, राहुल सोनवणे, अमोल कोरडे, याशिवाय शहर भाजप पदाधिकारी दीपक भोंडवे, रावेत वाल्हेकरवाडी मंडलाध्यक्ष मोहन राऊत, श्रीकांत भोंडवे, माजी नगरसेवक बाळासाहेब तरस, सोमनाथ भोंडवे आदी उपस्थित होत्या. आमदार आपल्या दारी उपक्रमातून आमदार शंकर जगताप यांनी अतिक्रमण मुक्त रावेतचा निर्धार करताना पादचाऱ्यांना अडथळा ठरणाऱ्या फुटपाथवरील अतिक्रमणांवर कारवाई करण्याची सूचना केली. त्याचबरोबर वाहतुकीला अडथळे ठरणारे सर्व खाजगी व महानगरपालिकेच्या जागेवरील आठवडे बाजार यांच्यावर कडक कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. विकासनगर ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने विरंगुळा, सांस्कृतिक केंद्राची उभारणी करण्याची मागणी करण्यात आली.

## श्रमिकांच्या कष्टाने कामगार नगरीचा विकास - महापौर रवी लांडगे

■ पिंपरी (दै. संध्या)

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी सांगितले आहे की, "पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरलेली नसून ती कष्टकऱ्यांच्या, श्रमिकांच्या तळहातावर तरलेली आहे." याप्रमाणे श्रमिकांच्या कष्टाने पिंपरी चिंचवड या औद्योगिक आणि कामगार नगरीचा विकास झाला आहे. कामगारांच्या न्याय हक्कासाठी लढणारे कामगार नेते इंटकचे प्रदेशाध्यक्ष डॉ. कैलास कदम आणि त्यांची हिंद कामगार संघटना देशभर कार्यरत आहे. या संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त दरवर्षी एका कामगाराला 'हिंद रत्न कामगार पुरस्कार' देण्यात येतो. यावर्षीचा पुरस्कार प्रथमच एका परिचारिका महिलेला देण्यात येत आहे. हा पुरस्कार म्हणजे सर्व परिचारिकांचा सन्मान आणि इतरांना प्रेरणादायी आहे. यावर्षीच्या पुरस्कारार्थी या नूतन भोसरी रुग्णालयातून स्वेच्छा निवृत्ती घेतलेल्या परिचारिका मीरा शिंदे यांचे मी अभिनंदन करतो. त्यांनी स्वाईन फ्लू आणि कोरोनाच्या काळात आपले कर्तव्य जबाबदारीने पार पाडले त्यांची निवड सार्थ आहे असे




पिंपरी चिंचवडचे महापौर रवी लांडगे यांनी सांगितले. हिंद कामगार संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त मीरा शिंदे यांना 'हिंद रत्न कामगार पुरस्कार २०२६' महापौर रवी लांडगे यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. या पुरस्काराचे स्वरूप मानपत्र, स्मृतीचिन्ह, शाल, श्रीफळ, रोख रक्कम आहे. यावेळी इंटकचे प्रदेशाध्यक्ष व हिंद कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. कैलास कदम, माजी नगरसेवक सद्गुरु कदम, भारती घाग, निवृत्त पोलीस अधिकारी रघुनाथ मोरे, हाफिज पठान, आनंदराव फडतरे, यशवंत सुपेकर, उपस्थित होते.

## 'महर्षी दयानंद पुणे प्रवास १५१ वा स्मृती समारंभ' कार्यक्रमाचे आयोजन

■ पिंपरी (दै. संध्या)

युग प्रवर्तक, आर्य समाज संस्थापक महर्षी दयानंद सरस्वती यांनी सन १८७५ साली पुण्यामध्ये विविध ठिकाणी निवडक व्याख्याने दिली होती, या घटनेला १५१ वर्ष पूर्ण होत आहेत. त्या प्रित्यर्थ या ऐतिहासिक स्मृतींना उजाळा देण्यासाठी पुण्यामध्ये भव्य शोभायात्रा आणि पिंपरी येथे प्रवचनाचे आयोजन करण्यात आले आहे.

रविवारी, (दि. ६ सप्टेंबर) सकाळी ७ वाजता पुणे कॅम्प मधील म्हस्के वाडा, एमजी रोड, राम मंदिर जवळ येथून या भव्य शोभा यात्रेची सुरुवात होऊन सकाळी ९ वाजता, तांबडी जोगेश्वरी मंदिर, आप्पा बळवंत चौक येथील बाळकृष्ण भिडे वाडा येथे समारोप होईल. यानंतर पिंपरी कॅम्प येथील आर्य समाज भवन येथे १० वाजता, "महर्षी दयानंद पुणे प्रवास व प्रवचने, १५१ वा स्मृती संमारंभ" हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे अशी माहिती पिंपरी आर्य समाज संस्थेच्या वतीने प्रसिद्धीस दिली आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षपद पिंपरी आर्य समाजचे प्रधान सुरेंद्र करमचंदानी हे भूषविणार आहेत. तसेच सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभा दिल्लीचे महामंत्री अॅड. प्रकाश आर्य, आर्य प्रतिनिधी सभा दिल्ली महामंत्री विनय आर्य, चित्तोडगढ राजस्थान येथील वैदिक विद्वान आचार्य कर्मवीर मेधार्थी, मथुरा उत्तर प्रदेश येथील आर्योपदेशक उदयवीर आर्य हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच आर्य प्रतिनिधी सभा मुंबईचे प्रधान हरीश आर्य, विजय गौतम मंत्री, विदर्भ आर्य प्रतिनिधी सभेचे प्रधान सत्यवीर शास्त्री, विदर्भ आर्य प्रतिनिधी सभेचे प्रधान स्वामी विद्यानंद सरस्वती आदींची विशेष उपस्थिती आहे. पिंपरी कॅम्प आर्य समाज भवन येथे सकाळी १०:३० वाजता, प्रवचनास प्रारंभ होणार आहे. तत्पूर्वी, रविवारी सकाळी ७ वाजता, पुणे कॅम्प, एमजी रोड, राम मंदिर शेजारील म्हस्के वाडा येथून आप्पा बळवंत चौक तांबडी जोगेश्वरी मंदिर शेजारील भिडे वाडा पर्यंत भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभा, पुणे शहर, पिंपरी, नाना पेठ, वारजे, खडकी, आळंदी आर्य समाज यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. वेदोद्धारक, युगप्रवर्तक महर्षी दयानंद सरस्वती यांच्या "पुणे आगमन, वास्तव्य व ऐतिहासिक पुणे प्रवचने" यांस यावर्षी १५१ वर्षे पूर्ण होत आहेत.

## महिलेचा दुर्दैवी मृत्यू;

■ पिंपरी (दै. संध्या)

दहीहंडी उत्सवानंतर लोखंडी सांगाडा उतरविताना झालेल्या भीषण अपघातात एका 45 वर्षीय महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना जुन्या सांगवी परिसरात घडली. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सलमा सलाउद्दीन पठाण या महिला दहीहंडी उत्सव संपल्यानंतर घटनास्थळी उपस्थित होत्या. रात्री सुमारे 11 वाजण्याच्या सुमारास मंडळाचे कार्यकर्ते दहीहंडीसाठी उभारलेला लोखंडी सांगाडा काढत असताना त्याचा एक अवजड भाग अचानक निसटून खाली पडला.

# अभियंते हे राष्ट्रनिर्माणाचे शिल्पकार : डॉ. प्रमोद पाटील

■ पिंपरी (दै. संध्या)

एआय या प्रगत तंत्रज्ञानाकडे मर्यादित कल्पना असतात, परंतु आपण स्वतःच्या बुद्धी कौशल्यावर विश्वास ठेवून काम केले तर ते 'आउट ऑफ द बॉक्स' म्हणजेच नाविन्यपूर्ण ठरू शकते. आपल्या मेंदूला ज्या कल्पना सुचू शकतात त्या एआय ला शक्य नाही. स्वतःवर विश्वास ठेवा, उद्याचे अभियंते हेच खरे राष्ट्र निर्माणाचे शिल्पकार आहेत असे कोल्हापूर येथील डीवाय पाटील एज्युकेशन सोसायटीचे संशोधन संचालक डॉ. प्रमोद पाटील यांनी केले.




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट च्या रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड रिसर्च च्या वतीने आयईईई महाराष्ट्र सेक्शन च्या सहकार्याने "एशियन कॉन्फरन्स ऑन इनोवेशन इन इमर्जिंग टेक्नॉलॉजी (एएसआयएसीओएनएफ) २०२६" या ६ व्या आशियाई परिषदेचे उद्घाटन प्रसंगी डॉ. प्रमोद पाटील बोलत होते.

यावेळी मुंबईतील अॅटलास स्किलटेक युनिव्हर्सिटीचे डॉ. शशिकांत पाटील, सिम्बॉयसिस इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी चे संचालक डॉ. केतन कोटेच्या, पीसीसीओईआरचे संचालक व प्राचार्य डॉ. हरीश तिवारी आणि उद्योजक जयश जगताप, महाराष्ट्र सेक्शन वाईस चेअर डॉक्टर सौरभ सोनी, डॉ. प्रमोद बिडे, व्हॉइस चेअर इंडिया कौन्सिल डॉ. चाणक्य झा, समन्वयक डॉ. राहुल मापारी, पीसीसीओईआरचे इ अँड टीसी विभाग प्रमुख डॉ. किरण नाप्ते, डॉ. विजय लक्ष्मी कुंभार आदी उपस्थित होते. यावेळी परिषदेच्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

आज एआयचा वापर ५ टक्के होत आहे आणि ९५ टक्के क्षेत्र अजूनही प्रतीक्षेत आहे. यासाठी योग्य दिशेने वाटचाल केली पाहिजे. केवळ ऊर्जा निर्माण करणे पुरेसे नाही, तर ती कशी निर्माण केली जाते हे महत्त्वाचे आहे. एआय हवामानाचा अंदाज आणि शाश्वततेचे गणित मांडत आहे. विषारी वायूंसारखे हानिकारक शोध लावू नयेत. धोक्याची पूर्वसूचना देणारी उपकरणे महत्त्वाची आहेत. यासाठी केवळ एआय वर अवलंबून राहणे पुरेसे नाही. आपल्या फोनमध्ये ८० प्रकारची खनिजे असतात. ई-कचरा, पुनर्वापर आणि अपसायकलिंग यासाठी प्रयत्न आवश्यक आहे. एआय द्वारे तयार केलेले ७० टक्के प्रकल्प नाकारले जातात, त्यामुळे आधी स्वतःहून काम करणे महत्त्वाचे आहे असेही कोल्हापूर येथील डीवाय पाटील एज्युकेशन सोसायटीचे संशोधन संचालक डॉ. प्रमोद पाटील यांनी सांगितले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीसीओईआर चे संचालक प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

डॉ. हरीश तिवारी यांनी सांगितले की, संशोधनाच्या क्षेत्रात 'एआय'चा वापर करणे म्हणजे ती 'नवनिर्मिती' असावी. समस्या सोडवून उपयुक्त उत्तर शोधणे, म्हणजेच 'नवनिर्मिती' होय. डॉ. केतन कोटेजा यांनी सांगितले की, 'न्यूरो-सिम्बॉलिक एआय' द्वारे आपण समाजाला फायदा मिळवून देऊ शकतो. यात सीएनएन, न्यूरो एआय आणि सिम्बॉलिक एआय यांचा समावेश होतो. एआय मधील ९९ टक्के समस्या 'कोझल एआय म्हणजे कार्यकारणभाव आधारित एआय द्वारे सोडवल्या जात आहेत. शशिकांत पाटील यांनी सांगितले की, आयईईई ही जगभरातील एक व्यावसायिक संस्था आहे. विद्यार्थ्यांसह यात ५ लाख सदस्य आहेत. शिक्षण, तंत्रज्ञान, संशोधन, आपत्ती व्यवस्थापन, समाज विकास यात आयईईई संस्था काम करते.

डॉ. दिनेश अमळनेरकर यांनी सांगितले की, एका स्मार्टफोनवर १२ पेक्षा जास्त लोकांनी संशोधन कार्य केलेले आहे. आपणही एक प्रभावी प्रणाली विकसित करू शकतो.

## थोडक्यात पण महत्वाचे



### ‘माऊली माऊली’च्या जयघोषात रंगला ज्ञानेश्वरांचा जन्मोत्सव

**वाल्हे : दैनिक संध्या**

ज्ञानेश्वर महाराजांच्या जन्मोत्सवानिमित्त वाल्हे (ता. पुरंदर) येथील महर्षी वाल्मिकी मंदिरात ग्रामस्थांच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडले. भजन, अभंग आणि टाळ-मृदंगाच्या गजरात ‘माऊली माऊली’, ‘ज्ञानोबा-तुकाराम’च्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला. यावेळी उद्योजक मोहन पवार व माजी सरपंच अमोल खवले यांच्या हस्ते संत ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. महर्षी वाल्मिकी सेवा मंडळाच्या भजनी मंडळाने सादर केलेल्या अभंग व भक्तिगीतांनी वातावरणात चैतन्य निर्माण केले. दुपारी सव्वा एकच्या सुमारास संत ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रतिमेवर पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी राजेंद्र काळंगे, मारुती रोकडे, दादा घाटे यांच्यासह ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी भाविकांनी ‘माऊली माऊली’चा जयघोष करत परिसर भक्तिमय करून टाकला. अशोकमहाराज पवार यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या भजन कार्यक्रमात बबनमहाराज भुजबळ, पांडुरंग पवार, राजेंद्र पवार, नाथसो पवार, विनायक पवार, दिलीप नाझरे आदी सहभागी झाले. यावेळी रश्मी पवार व श्रेया शहा यांनी रंगीबेरंगी रांगोळीच्या माध्यमातून साकारलेली संत ज्ञानेश्वर महाराजांची आकर्षक प्रतिकृती भाविकांचे लक्ष वेधून घेत होती. या दरम्यान उद्योजक मोहन पवार यांच्या वतीने उपस्थित भाविकांना उपवासाच्या पदार्थांचे वाटप करण्यात आले.

### चाकण उद्योग नगरीत अतिक्रमण कारवाई

**चाकण : दैनिक संध्या**

उद्योग पंढरीचे नाक असलेल्या चाकण औद्योगिक परिसरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यांवरील अतिक्रमण कारवाईचा निकष आता १२.५ मीटरवरून ९ मीटरपर्यंत कमी करण्यात आला आहे. खेडचे आमदार बाबाजी काळे यांनी प्रशासनाकडे केलेल्या मागणीनंतर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यामुळे या कारवाईमुळे होणारे नागरिकांचे मोठे नुकसान टळले असून, त्यांना प्रचंड दिलासा मिळाला आहे. चाकण औद्योगिक परिसरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग रस्त्यांवरील अतिक्रमणे काढण्याची कारवाई करत आहे. यासाठी रस्त्याच्या मध्यभागापासून दोन्ही बाजूंना १२.५ मीटरपर्यंत अतिक्रमण काढण्याचे नियोजन होते. या कारवाईमुळे अनेक नागरिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी नुकसान टाळण्यासाठी निदान १२.५ मीटरऐवजी ९ मीटरपर्यंतच अतिक्रमण कारवाई करावी, अशी मागणी केली होती. खेड तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यातील चाकण - भांबोली या रस्त्यावरील बिरदवडी आणि आंबेठाण येथील नागरिकांनी या निर्णयाविरोधात रस्त्यावर उतरून तीव्र नाराजी व्यक्त केली होती. तसेच आंदोलनाचा इशाराही दिला होता. या संदर्भात आमदार काळे यांनी पुणे येथे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्यासह इतर अधिकाऱ्यांसोबत आयोजित आढावा बैठकीत हा मुद्दा प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिला. त्यांनी सांगितले की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या पाच प्रमुख जिल्हा मार्गांवर ही अतिक्रमण कारवाई केली जात आहे. या कारवाईचा निकष १२.५ मीटर ऐवजी ९ मीटर असावा, अशी सर्वसामान्यांची भावना आहे. चाकण औद्योगिक भागातील नागरिकांची भावना लक्षात घेऊन साडेबारा मीटर ऐवजी नऊ मीटरने आता अतिक्रमण कारवाई करणे सर्वांच्या हिताचे वाटते. नुकसान टळल्याने नागरिकांना दिलासा मिळू शकतो. दरम्यान, आमदार काळे यांच्या या मागणीची दखल घेत जिल्हाधिकारी जितेंद्र दुडी यांनी तातडीने ही कारवाई ९ मीटरपर्यंत करावी, अशा सूचना दिल्या आहेत. या निर्णयामुळे कारवाई होणाऱ्या पाच प्रमुख जिल्हा मार्गावरील नागरिकांना प्रचंड दिलासा मिळाला आहे. पूर्वीच्या १२.५ मीटरच्या निकषामुळे होणारे मोठे नुकसान आता टळले आहे.



### काळदरी विद्यालयात मातांचे भावूक वातावरणात पायपूजन

**जेजुरी: दैनिक संध्या**

श्री. केदारेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमध्ये या विद्यालयात जागतिक मातृदिनाचे औचित्य साधत समाज आणि विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांची रुजवणूक करण्यासाठी 'माता पायपूजन' सोहळा अत्यंत भावूक आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला."आदी गुरूसी वंदावे | मग साधनं साधावे || गुरु म्हणजे माय बापं | नाम घेता हरतील पाप || गुरु म्हणजे आहे काशी | साती तिर्थ आहे तया पाशी || तुका म्हणे ऐंसे गुरु | चरण त्याचे हृदयीं धरू || या अभंगातून प्रेरणा घेऊन आई-वडील हेच खरे जिवंत दैवत आहेत," हा संदेश दिला. यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या मातांचे पाय धुवून आणि औक्षण करून त्यांचे आशीर्वाद घेतले. कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयाचे प्राचार्य पांडुरंग दुर्गाडे यांच्या हस्ते सरस्वती पूजन करुन झाली. याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांच्या ७८ माता उपस्थित होत्या. विद्यालयाच्या प्रांगणात सर्व मातांना सन्मानाने आसनांवर बसवण्यात आले होते. विहित मंत्रोच्चार आणि भक्तीगीतांच्या सुरावलीत विद्यार्थ्यांनी प्रथम तांब्या-पात्रात आपल्या मातेचे पाय स्वच्छ पाण्याने धुवून घेतले. त्यानंतर कपाळावर कुंकवाचा टिळा लावून, अक्षता वाहून आणि आरती ओवाळून मातेचे कृतज्ञतापूर्वक पूजन केले. प्रत्येक विद्यार्थ्याने मातेच्या चरणी नतमस्तक होऊन तिचे आशीर्वाद घेतले, तर मातांनीही आपल्या पाल्यांना प्रेमाने मिठी मारत उदंड आयुष्याचा शुभाशिर्वाद दिला. आपल्या मुलांकडून मिळालेला हा अभूतपूर्व आदर आणि सन्मान पाहून अनेक मातांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. संपूर्ण विद्यालय काही काळ कमालीच्या भावनिक वातावरणात हरवून गेले होते. याप्रसंगी बोलताना विद्यालयातील उपक्रमशील शिक्षिका सुनंदा टकले म्हणाल्या, "आजच्या आधुनिक आणि गतीमान युगात तरुण पिढी पाश्चात्य संस्कृतीकडे आकर्षित होत असताना, अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे मुलांमध्ये मातृभक्ती आणि कौटुंबिक मूल्यांचे संस्कार कायम राहतात. आईचे ऋण आपण कधीच फेडू शकत नाही, पण तिची सेवा करणे आपले आद्य कर्तव्य आहे." विद्यालयाचे प्राचार्य पांडुरंग दुर्गाडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, "सध्या केवळ शैक्षणिक प्रगती महत्त्वाची नसून सुसंस्कृत नागरिक घडवणे हे शाळेचे ध्येय आहे. दरवर्षी हा उपक्रम शाळेत राबवला जाईल." अशी ग्वाही त्यांनी दिली. काही मातांनी आपले मनोगत व्यक्त करताना शाळेच्या या स्तुत्य उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. याप्रसंगी अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, "आज आईचे पाय पूजताना आम्हाला जे समाधान मिळाले, ते कोणत्याही देवाच्या दर्शनापेक्षा मोठे होते." कार्यक्रमाचा समारोप सामूहिक पसायदानाने झाला.

# आय व्ही इस्टेट रस्त्यावर ड्रेनेज तुंबल्याने नागरिक त्रस्त

■ वाघोली (दै. संध्या)

वाघोली येथील भाडळे नगर परिसरातून आय व्ही इस्टेटकडे जाणाऱ्या रस्त्यावर ड्रेनेज लाईन तुंबल्याने सांडपाणी रस्त्यावर आल्याची समस्या निर्माण झाली आहे. मोठ्या प्रमाणात सांडपाणी साचून राहिल्याने या मार्गावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांना आणि वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. ड्रेनेजचे सांडपाणी रस्त्यावर साचल्याने परिसरात दुर्गंधी पसरली असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. साचलेल्या सांडपाण्यातूनच नागरिकांना मार्ग काढत ये-जा करावी लागत आहे. तसेच रस्त्यावरून दुचाकी आणि चारचाकी वाहने चालविताना वाहनधारकांना मोठी कसरत करावी लागत असून अपघाताचा धोका निर्माण झाला आहे.

गेल्या काही काळापासून या समस्येमुळे परिसरातील नागरिक त्रस्त असून, संबंधित प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी होत आहे. पुणे महानगरपालिका प्रशासनाने तातडीने तुंबलेली ड्रेनेज लाईन दुरुस्त करून रस्त्यावर साचलेले सांडपाणी हटवावे आणि नागरिकांची दुर्गंधी व अस्वच्छतेतून सुटका करावी, अशी मागणी भाडळे नगर आणि आय व्ही इस्टेट परिसरातील नागरिकांनी केली आहे. ड्रेनेजची समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी प्रशासनाने केवळ तात्पुरती उपाययोजना न करता आवश्यक त्या दुरुस्तीचे काम तातडीने पूर्ण करावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.



## बारामतीत १६ वर्षीय विद्यार्थिनीची टेरेसवरून उडी

■ बारामती (दै. संध्या)

बारामती शहर पोलीस स्टेशन हद्दीतील भिगवण रोड परिसरातील एका निवासी इमारतीमध्ये राहणाऱ्या 16 वर्षीय विद्यार्थिनीने दि. 04/09/2026 रोजी पहाटे इमारतीच्या चौथ्या मजल्यावरील टेरेसवरून खाली उडी मारल्याची घटना घडली आहे. या घटनेत गंभीर जखमी झालेल्या विद्यार्थिनीला तातडीने उपचारासाठी वैद्यकीय महाविद्यालय, बारामती येथे दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान पहाटे सुमारे 05.00 वाजण्याच्या सुमारास तिचा मृत्यू झाला.

सदर विद्यार्थिनी बारामती येथील एका महाविद्यालयात इयत्ता अकरावी सायन्समध्ये शिक्षण घेत होती. सध्या तिच्या परीक्षा सुरू होत्या. तिच्या आई-वडिलांनी पोलिसांना दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, मागील काही दिवसांपासून ती अभ्यास व परीक्षेचा ताण घेत होती. अभ्यास होत नसल्याबाबत तसेच परीक्षेचे टेन्शन येत असल्याबाबत ती आई-वडिलांकडे बोलत असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

दि. 04/09/2026 रोजी रात्री ती सुमारे 12.30 वाजेपर्यंत अभ्यास करत होती. त्यानंतर टेरेसवर जाऊन येत असल्याचे सांगून ती इमारतीच्या चौथ्या मजल्यावरील गच्चीवर गेली. बराच वेळ होऊनही ती खाली न आल्याने तिचे वडील तिला पाहण्यासाठी वर गेले. त्यावेळी ती टेरेसच्या कड्यावर खाली पाय सोडून बसलेली दिसली. वडिलांनी तिला आवाज देऊन विचारणा केली असता तिने त्यांच्याकडे पाहून अचानक टेरेसवरून खाली उडी मारल्याची माहिती प्राथमिक चौकशीतून प्राप्त झाली आहे.

विद्यार्थिनी इमारतीच्या समोरील भागात खाली पडल्याने तिला गंभीर दुखापत झाली. आई-वडील व शेजाऱ्यांच्या मदतीने तिला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार सुरू असताना काही काळ ती शुद्धीवर होती व तिने आईकडे पिण्यासाठी पाणी मागितल्याची माहिती पालकांनी दिली आहे.

त्यानंतर तिची प्रकृती गंभीर झाली व उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. सदर घटनेबाबत विद्यार्थिनीच्या आई-वडिलांनी अथवा नातेवाईकांनी सद्यस्थितीत कोणत्याही व्यक्तीविरुद्ध तक्रार किंवा संशय व्यक्त केलेला नाही. अभ्यास व परीक्षेचा ताण असल्याची प्राथमिक माहिती पालकांकडून प्राप्त झाली असली तरी, आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप निश्चित करण्यात आलेले नाही. सदर विद्यार्थिनीबाबत यापूर्वीही घरातून निघून गेल्याची नोंद बारामती शहर पोलीस स्टेशन येथे करण्यात आली होती. त्या संदर्भातील पूर्वीच्या प्रकरणातील कागदपत्रे, जबाब व तपासादरम्यान निष्पन्न झालेल्या बाबींची सद्य घटनेच्या अनुषंगाने पडताळणी करण्यात येत आहे.

प्राथमिक चौकशीत सदर विद्यार्थिनीकडे स्वतःचा वैयक्तिक मोबाईल फोन नसल्याची माहिती मिळाली आहे. ती आवश्यकतेनुसार तिच्या आई-वडिलांच्या मोबाईल फोनचा वापर करत होती. त्या अनुषंगाने आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून संबंधित मोबाईलमधील घटनेशी संबंधित उपलब्ध डिजिटल माहितीची पडताळणी करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.

तसेच घटनास्थळाची पाहणी, आवश्यक पंचनामे, उपलब्ध सीसीटीव्ही फुटेज, वैद्यकीय कागदपत्रे, डिजिटल बाबी तसेच पालक, नातेवाईक, मैत्रिणी, सहाध्यायी, शिक्षक व आवश्यक संबंधित व्यक्तींचे जबाब घेऊन घटनेमागील नेमकी वस्तुस्थिती निष्पन्न करण्याच्या दृष्टीने बारामती शहर पोलिसांकडून सखोल चौकशी करण्यात येत आहे.

अभ्यासाचा ताण हे पालकांकडून सांगण्यात आलेले प्राथमिक कारण असून, त्याव्यतिरिक्त वैयक्तिक, शैक्षणिक, कौटुंबिक किंवा अन्य कोणती पार्श्वभूमी होती काय, तसेच कोणत्याही व्यक्तीकडून त्रास, दबाव किंवा आत्महत्येस प्रवृत्त करण्यासारखी बाब घडली होती काय, याचीही निष्पक्षपणे पडताळणी करण्यात येत आहे.

सदर प्रकरणी कायदेशीर प्रक्रियेनुसार अकस्मात मृत्यूची नोंद करून पुढील चौकशी बारामती शहर पोलीस स्टेशनकडून करण्यात येत आहे. अल्पवयीन मृत विद्यार्थिनीची ओळख गोपनीय ठेवण्यात आली आहे. नागरिक व प्रसारमाध्यमांनीही तिचे नाव, छायाचित्र किंवा ओळख पटेल अशी वैयक्तिक माहिती प्रसिद्ध करू नये, असे आवाहन बारामती शहर पोलिसांकडून करण्यात येत आहे.

## टी. सी. कॉलेज परिसरात बारामती वाहतूक शाखेची अचानक धडक

■ बारामती (दै. संध्या)

शहरातील महाविद्यालयीन परिसरात विद्यार्थिनींना सुरक्षित व निर्भय वातावरण मिळावे, छेडछाडीच्या प्रकारांना प्रतिबंध व्हावा तसेच महाविद्यालय परिसरात वेगाने, बेदरकारपणे व वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष करून वाहन चालविणाऱ्या वाहनचालकांवर प्रभावी नियंत्रण निर्माण व्हावे, या उद्देशाने मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. गणेश बिरादार यांच्या आदेशानुसार व मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. चैतन्य कदम यांच्या मार्गदर्शनाखाली बारामती वाहतूक शाखेकडून विशेष धडक कारवाई करण्यात आली.

मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. चैतन्य कदम यांनी महाविद्यालयीन विद्यार्थिनींची सुरक्षितता, कॉलेज परिसरातील बेदरकार वाहनचालक, ट्रिपल सीट, परवाना नसताना वाहन चालविणारे तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध अचानक नाकाबंदी करून कठोर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार बारामती वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. महेश स्वामी यांच्या नेतृत्वाखाली Tuljaram Chaturchand College, Baramati येथील गेटसमोर दि. ०४/०९/२०२६ रोजी सकाळी १०.०० ते १३.०० वाजेपर्यंत अचानक नाकाबंदी आयोजित करण्यात आली.

सदर कारवाईत बारामती वाहतूक शाखेचे १९ पोलीस अंमलदार तसेच १ आर.सी.पी. पथक सहभागी झाले होते. बारामती शहर पोलीस स्टेशनच्या मदतीने सदर नाकाबंदी प्रभावीपणे राबविण्यात आली. नाकाबंदी दरम्यान वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांची कसून तपासणी करण्यात आली. उपलब्ध कारवाई पत्रकानुसार एकूण ७८ केसेस करून ₹५९,००० दंडाची कारवाई करण्यात आली. याशिवाय नो एन्ट्री, नो सीटबेल्ट, विदाउट हेल्मेट, विदाउट इन्शुरन्स, विदाउट क्लिनर, विदाउट रेड रिफ्लेक्टर, अवैध प्रवासी वाहतूक तसेच मोटार वाहन कायदा कलम १८५ या बाबींचीही तपासणी करण्यात आली. विशेष म्हणजे, अल्पवयीन मुले-मुली वाहन चालवत असल्याबाबत १३ स्वतंत्र कारवाया करण्यात आल्या. अल्पवयीन मुलांच्या हातात वाहन देणे त्यांच्या स्वतःच्या तसेच इतर नागरिकांच्या जीवितासाठी धोकादायक ठरू शकते. त्यामुळे पालकांनी अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास देऊ नये, असे आवाहन वाहतूक शाखेकडून करण्यात आले आहे. महाविद्यालय सुरू होण्याच्या व सुटण्याच्या वेळेत परिसरात विनाकारण वाहने फिरविणे, ट्रिपल सीट वाहन चालविणे किंवा महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर वाहतूक अडथळा निर्माण करणे अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. चैतन्य कदम यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयीन परिसरांमध्ये विशेष प्रतिबंधात्मक पोलिसिंगवर भर देण्यात येत आहे.



## चाकण शहराच्या डीपीआरला लवकरच मंजुरी - अहिर

■ चाकण (दै. संध्या)

दिवसेंदिवस प्रचंड वेगाने विस्तारणाऱ्या चाकण शहराच्या विकासासाठी लवकरच डीपीआरला मंजुरी देण्यासाठी प्रयत्न करू, असे ठोस आश्वासन विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांनी दिले. चाकण शहर व औद्योगिक परिसराचा दौरा करून विविध विकासकामे व येथे आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात अहिर बोलत होते. चाकण शहराच्या डीपीआरला लवकरात लवकर मंजुरी, डीपीडीसी व सीएसआरच्या माध्यमातून विकास कामांसाठी निधी, वाहतूक कोंडी, रस्ते, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, ड्रेनेज व एमआयडीसीतील पायाभूत सुविधांचे प्रश्न यावर तातडीने तोडगा काढण्याचे आश्वासन त्यांनी दिले. चाकण नागरी सहकारी पतसंस्थेला सदिच्छा भेटही दिली.

चाकण नगरपरिषदेला भेट देऊन नगराध्यक्ष, मुख्याधिकारी तसेच सर्व नगरसेवकांशी संवाद साधला. शहरातील विविध प्रभागांमधील प्रलंबित विकासकामे व नागरिकांच्या समस्या त्यांनी जाणून घेतल्या. रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, कचरा व्यवस्थापन, वाहतूक कोंडी, पार्किंग तसेच शहरातील पायाभूत सुविधांबाबत नगरसेवकांनी आपापले प्रश्न मांडले. चाकण नगरपरिषदेचे विविध विषयांचे सभापती यांच्या दालनाचे उद्‌घाटन सचिन अहिर यांनी केले.

चाकण शहराच्या विकासासाठी शासनाच्या विविध विभागांशी समन्वय साधून प्रलंबित कामांचा पाठपुरावा करण्यासाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शहरातील विकास कामांना शासन स्तरावर अधिक गती मिळणार आहे. स्व.आमदार सुरेशभाऊ गोरे जनसंपर्क कार्यालयात सचिन अहिर यांचा सन्मान करण्यात आला आहे. चाकणचा डीपीआर लवकरात लवकर मंजूर व्हावा, यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन अहिर यांनी दिले. तसेच डीपीडीसी सीएसआरच्या माध्यमातून शहरातील विकास कामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले. चाकणच्या वाढत्या लोकसंख्येच्या आणि औद्योगिक विस्ताराच्या तुलनेत रस्ते, पाणी, ड्रेनेज, पार्किंग व इतर पायाभूत सुविधा सक्षम करण्याची गरज असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य तथा चाकण नगरपरिषदेचे शिवसेना गटनेते नितीन गोरे यांच्या समवेत चाकण एमआयडीसी परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली.

# गणेशोत्सवात ध्वनिक्षेपक वापराबाबत महत्त्वाची सूचना

■ बारामती (दै. संध्या)

आगामी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेशोत्सव मंडळे, पदाधिकारी, ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यंत्रणा वापरणारे व्यावसायिक तसेच नागरिकांनी ध्वनीप्रदूषणासंदर्भातील नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पुणे श्री. जितेंद्र डुडी यांनी ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० तसेच ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) सुधारित नियम, २०१७ मधील तरतुदींनुसार सन २०२६ मध्ये ध्वनिक्षेपक व ध्वनीवर्धक यंत्रणेच्या वापरासाठी विशिष्ट सण-उत्सवांच्या दिवशी वेळेची मर्यादा शिथिल करण्याबाबत आदेश निर्गमित केला आहे.

सदर आदेशानुसार गणपती उत्सव सन २०२६ मध्ये खालील सहा दिवशी सकाळी ६.०० वाजल्यापासून रात्री १२.०० वाजेपर्यंत, निर्धारित ध्वनीमर्यादेचे पालन करून ध्वनिक्षेपक व ध्वनीवर्धक यंत्रणेचा वापर करण्यासाठी वेळेची सवलत देण्यात आली आहे. दि. १९/०९/२०२६, शनिवार – गणेशोत्सवाचा सहावा दिवस

दि. २०/०९/२०२६, रविवार – सातवा दिवस दि. २२/०९/२०२६, मंगळवार – नववा दिवस दि. २३/०९/२०२६, बुधवार – दहावा दिवस दि. २४/०९/२०२६, गुरुवार – अकरावा दिवस दि. २५/०९/२०२६, शुक्रवार – बारावा दिवस / अनंत चतुर्दशी

रात्री १२ वाजेपर्यंतची सवलत म्हणजे अमर्याद आवाजाची परवानगी नाही गणेशोत्सव मंडळांनी विशेषतः नोंद घ्यावी की, वरील दिवशी रात्री १२.०० वाजेपर्यंत दिलेली सवलत ही केवळ वेळेच्या मर्यादेतील शिथिलता आहे. संबंधित परिसरासाठी निर्धारित केलेल्या ध्वनीमर्यादेपेक्षा जास्त आवाज करण्याची परवानगी यामुळे मिळत नाही.

ध्वनी प्रदूषण नियमांनुसार संबंधित क्षेत्राच्या झोनिंगप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या ध्वनीमर्यादेचे काटेकोर पालन करणे सर्व संबंधितांवर बंधनकारक राहील. परवानगीमध्ये नमूद केलेल्या अटी, ध्वनीमर्यादा आणि वेळेचे उल्लंघन होणार नाही याची जबाबदारी संबंधित आयोजक व यंत्रणा वापरणाऱ्या व्यक्तींची राहील. मा. जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार ही विशेष सवलत शांतता क्षेत्रामध्ये लागू राहणार नाही. रुग्णालये, न्यायालये, शैक्षणिक संस्था तसेच नियमानुसार घोषित शांतता क्षेत्रांमध्ये लागू असलेल्या ध्वनीविषयक निर्बंधांचे पूर्णपणे पालन करणे आवश्यक आहे. गणेशोत्सवातील वरील अधिसूचित सहा दिवस वगळता अन्य दिवशी ध्वनिक्षेपक व ध्वनीवर्धक यंत्रणेच्या वापराबाबत प्रचलित नियमांनुसार निर्धारित वेळेचे पालन करणे आवश्यक राहील. त्यामुळे प्रत्येक मंडळाने आपल्या परवानगीतील वेळ व अटी काळजीपूर्वक तपासून त्यानुसारच ध्वनी यंत्रणेचा वापर करावा. पोलीस प्रशासनाकडून आवश्यकतेनुसार ध्वनीपातळीची तपासणी करण्यात येणार असून निर्धारित ध्वनीमर्यादा, वेळेची अट किंवा सक्षम प्राधिकरणाने घालून दिलेल्या नियमांचे उल्लंघन आढळल्यास लागू कायदे व नियमांनुसार योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. गणेशोत्सव हा श्रद्धा, भक्ती, आनंद आणि सामाजिक एकोप्याचा उत्सव आहे. उत्सवाचा आनंद साजरा करताना रुग्ण, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, विद्यार्थी तसेच सर्वसामान्य नागरिकांना त्रास होणार नाही याची प्रत्येक मंडळाने सामाजिक जबाबदारी म्हणून दक्षता घ्यावी.

“वेळेची सवलत जरूर आहे, मात्र ध्वनीमर्यादेची सवलत नाही” ही बाब लक्षात ठेवून सर्व गणेशोत्सव मंडळांनी कायद्याचे पालन करावे आणि गणेशोत्सव शांततामय, सुरक्षित व शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### इस्कॉन मंदिरात जन्माष्टमीनिमित्त भव्य कृष्ण समर्पण सांस्कृतिक महोत्सव

**पुणे : दैनिक संध्या**

आंतरराष्ट्रीय कृष्ण भावनामृत संघाच्या (इस्कॉन) पुण्यातील कात्रज कोंढवा रस्ता आणि कँप येथील मंदिरांमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. संस्थापक आचार्य भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांनी स्थापित केलेली मंदिरे असून दिनांक ४ सप्टेंबरला श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सवा अंतर्गत सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवात देशभरातून सुमारे ७०० कलावंत, बालकलाकार आणि संस्था शास्त्रीय नृत्य, गायन, नाट्य, वादन करून त्यांची कला भगवंतांना समर्पित करणार आहेत, अशी माहिती मंदिराचे प्रवक्ते जनार्दन चितोडे, उपाध्यक्ष संजय भोसले आणि संपर्क प्रमुख प्रसाद कारखानीस यांनी पत्रकार परिषदेत दिली. संजय भोसले म्हणाले, श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त मंदिरातील तिन्ही गाभाऱ्यातील श्री श्री राधा-वृंदावन चंद्र, जगन्नाथ-बलदेव-सुभद्रा आणि गौर-निताई यांच्या विग्रहांना आकर्षक वस्त्र-आभूषणांनी सजविण्यात येणार आहे. भगवंतांचे या वर्षाचे वस्त्र आकर्षक कला कुसरीने युक्त असे राजस्थानी पद्धतीचे असणार आहे. सुमारे ५०० किलो ताजी फुले गाभाऱ्याच्या सजावटी साठी वापरण्यात येणार आहेत. याच मंदिराच्या आवारात श्री बालाजींचे सुंदर मंदिर आहे. या सर्व मंदिरांवर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येणार आहे. श्रीकृष्ण जन्म आणि लीलांवर आधारित कथासुद्धा आजपासून सलग पाच दिवस मंदिरात चालू असणार आहे. दोन्ही मंदिरात सुमारे पाच लाख भाविक दर्शनासाठी येतील. मुख्य श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सव ४ सप्टेंबर रोजी म्हणजेच शुक्रवारी आहे. पहाटे ४.३० वाजता मंगल आरतीने सुरुवात होईल. हरे-कृष्ण महामंत्राचे २४ तास कीर्तन चालू रहाणार आहे. रात्री ९.३० वाजता भगवंतांना दूध-तूप-दही-मध-महाऔषधी -विविध फळांचा रस-गंगा यमुना आदी पवित्र नद्यांचे जल अश्या सुमारे ६०० लिटर विविध द्रव्यांनी १३० कलशांमधून १५१ पुजारी भक्तांतर्फे हरे-कृष्ण महामंत्राच्या घोषात अभिषेक करण्यात येईल. रात्री ११ वाजता भगवंतांना अनेक प्रकारचे अन्नपदार्थ-फळे-सुकामेवा-रस इत्यादीं ५६ भोगा अर्पित करण्यात येतील. त्यानंतर मध्यरात्री १२ वाजता भगवंतांची आरती होईल. मध्यरात्री १२.३० वाजेपर्यंत दर्शन चालू राहील. सुमारे पाच लाख भाविकांना प्रसाद वाटपाची व्यवस्था देखील करण्यात आली आहे. सुमारे ३०० स्वयंसेवक भक्त प्रसाद तयार करणे आणि वितरणाची व्यवस्था पाहणार आहेत. गीता आणि भागवतावर आधारीत माहिती, आध्यात्मिक पुस्तके, पूजा-अर्चेचे साहित्य, भेटवस्तू, अगरबत्त्या, धूप, जपमाळा, गो-उत्पादने, आध्यात्मिक प्रश्न-मंजुषा, आध्यात्मिक शंका-समाधान, असंख्य प्रकारच्या फोटो-फ्रेम, असे भरपूर स्टॉल्स त्याबरोबरच विविध खाद्य पदार्थांचे स्टॉल्ससुद्धा मांडण्यात येणार आहेत. यासाठी तसेच गर्दीचे नीट व्यवस्थापन करण्यासाठी सुमारे १००० स्वयंसेवक भक्त सेवा प्रदान करणार आहेत. पुणे आणि परिसरातील नागरिकांनी भगवंतांच्या दर्शन, कथा आणि प्रसाद यांचा लाभ घ्यावा असे आवाहन मंदिराचे अध्यक्ष राधेश्याम प्रभू आणि विश्वस्तांनी यांनी केले आहे. मंदिराच्या परिसरात वाहतूक कोंडी टाळण्यासाठी भाविकांनी सार्वजनिक वाहनांचा वापर करावा,असे आवाहन मंदिराच्या व्यवस्थानाद्वारे करण्यात आले आहे.

### जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसतर्फे १०वा आदर्श शिक्षक पुरस्कार मंगळवारी

**पुणे : दैनिक संध्या**

जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सतर्फे १०व्या आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार, दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता पुरस्कार वितरण समारंभ नऱ्हे येथील प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर शैक्षणिक संकुल-१ च्या सभागृहात होणार आहे. शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या विविध मान्यवरांचा यावेळी आदर्श कुलगुरू, आदर्श संस्थापक, आदर्श प्राचार्य आणि आदर्श प्राध्यापक या पुरस्कारांनी गौरव करण्यात येणार आहे, अशी माहिती इन्स्टिट्यूट्सचे उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर यांनी पत्रकार परिषदेत दिली. यंदाचा आदर्श कुलगुरू पुरस्कार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिकचे डॉ. संजीव सोनवणे, आदर्श संस्थापक पुरस्कार मराठवाडा मित्र मंडळ डेक्कन जिमखाना पुणेचे अध्यक्ष प्राचार्य भाऊसाहेब जाधव, आदर्श प्राचार्य पुरस्कार ग. तु. पाटील कला वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय नंदुरबारचे डॉ. महेंद्र रघुवंशी आणि आदर्श प्राध्यापक पुरस्कार सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अभियांत्रिकी विभागाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. पराग सदगीर यांना प्रदान करण्यात येणार आहे. पुणेरी पगडी, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशस्वी ग्रुपचे अध्यक्ष विश्वेश कुलकर्णी असतील. तसेच रांका ज्वेलर्स प्रा. लि.चे अध्यक्ष फतेचंद रांका प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड.शार्दुल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर यांसह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असेल. संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.शार्दुल जाधवर यांच्या वाढदिवसानिमित्त या पुरस्कार वितरण सोहळ्याचे दरवर्षी आयोजन केले जाते. माणूस पैशांनी मोठा झाला तरी आपल्या शिक्षकांचे ऋण विसरू नयेत. त्यांचा आदर करणे ही विद्यार्थ्यांची जबाबदारी आहे. अशा शिक्षकांप्रती ऋण व्यक्त करण्यासाठी आदर्श शिक्षक पुरस्काराचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना चांगल्या शिक्षणाबरोबर त्यांच्यातील कलागुण जोपासण्यासाठी शिक्षणसंस्थेकडून प्रयत्न केले जातात. त्यासाठी वर्षभरात विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. त्यामधील हा एक कार्यक्रम आहे, असेही ॲड.शार्दुल जाधवर यांनी सांगितले.

### डॉ. प्रविण जोशी यांची सहसचिवपदी निवड

**पुरंदर : दैनिक संध्या**

गुळुंचे (ता. पुरंदर ) येथील ग्रामीण लेखक, कवी, संशोधक डॉ. प्रविण जोशी यांची महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या सातारा जिल्ह्याच्या सहसचिवपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली. यावेळी तानाजी वाघमोडे यांची कोषाध्यक्षपदी, निलेश कर्वे यांची प्रसिद्धी प्रमुखपदी राजेंद्र निकाळजे यांची संपर्कप्रमुख पदी निवड जाहीर करण्यात आली. सातारा येथे झालेल्या बैठकीत जिल्हाध्यक्ष किरण यादव आणि सरचिटणीस संतोष घोडके यांनी त्यांना नियुक्तीपत्र प्रदान केले. डॉ. प्रविण जोशी पाडेगाव (ता. फलटण) येथील प्राथमिक शाळेवर कार्यरत आहेत. त्यांनी आजवर जनसामन्यांच्या अनेक प्रश्नांची सोडवणूक केली असून उपेक्षित, वंचित घटकांसाठी ते काम करतात. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना समितीने कार्य करण्याची संधी दिल्याचे यावेळी फलटण तालुक्याचे अध्यक्ष संतोष कोळेकर यांनी सांगितले. डॉ. जोशी यांच्या 'माणुसकीचा गाव' या पुस्तकाची शासन ग्रंथात नुकतीच निवड करण्यात आली होती. शिक्षकांचे तसेच शाळांचे प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेणार असल्याचे यावेळी डॉ. जोशी व सहकाऱ्यांनी सांगितले.

## पुण्यात 'व्हिझ-किड' रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेत २५० हून अधिक खेळाडूंचा सहभाग

■ पुणे (दै. संध्या)

किंग्ज इंडियन चेस क्लब (KICC) आणि बाकलीवाल ट्युटोरियल्स (BT) यांच्या संयुक्त विद्यमाने, पुणे जिल्हा बुद्धिबळ मंडळाच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या दुसऱ्या 'व्हिझ-किड वन-डे रॅपिड चेस टूर्नामेंट'मध्ये पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील २५० हून अधिक बुद्धिबळपटूंनी सहभाग घेतला. रविवारी (दि. ३०) वाकड येथील युरो स्कूलमध्ये ही स्पर्धा झाली. स्विस लीग पद्धतीने सात फेऱ्यांमध्ये झालेल्या या स्पर्धेसाठी ६० हजार रुपयांचे एकूण पारितोषिक ठेवण्यात आले होते. ११ वर्षांखालील, १३ वर्षांखालील, १५ वर्षांखालील, ३५ वर्षांवरील तसेच मुलींसाठी विशेष अशा पाच गटांत स्पर्धा घेण्यात आली. विजेत्यांना चषक, पदके आणि रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. ११ वर्षांखालील खुल्या गटात आयुष जगतापने प्रथम, तीर्थ कोद्रा याने द्वितीय, तर विश्वजा देशमुखने तृतीय क्रमांक मिळविला. १३ वर्षांखालील गटात एएफएम कविश लिमये प्रथम, विभव गुप्ता द्वितीय आणि विहान शाह तृतीय ठरले. १५ वर्षांखालील गटात चंद्रमौली जयकृष्णनने विजेतेपद पटकावले. डब्ल्यूसीएम अन्वी हिंगे द्वितीय तर प्रथमेश सुतार तृतीय आला.




३५ वर्षांवरील खुल्या गटात एफएम गौरव बाकलीवालने प्रथम क्रमांक मिळविला. आयएम विक्रमादित्य कुलकर्णी द्वितीय आणि राहुल वर्मा तृतीय ठरले. मुली व महिलांच्या विशेष गटात ११ वर्षांखाली शाल्वी चस्कर, १३ वर्षांखाली अन्वी शेळके, १५ वर्षांखाली समायरा राय आणि ३५ वर्षांवरील गटात आशा ठोंबरे यांनी विजेतेपद मिळविले. स्पर्धेच्या प्रमुख पाहुण्यांमध्ये राजस्थान राज्याचे माजी बुद्धिबळ विजेते तसेच जेईई १९९४ मध्ये अखिल भारतीय २२८२ वा क्रमांक मिळविलेले गौरव बाकलीवाल यांचा समावेश होता. बाकलीवाल ट्युटोरियल्सचे संस्थापक व संचालक वैभव बाकलीवाल यांनी विजेत्यांचा गौरव केला.

त्यांनी सहभागी विद्यार्थ्यांसोबत कोडी व बुद्धिबळाशी संबंधित प्रश्नमंजुषेच्या माध्यमातून संवाद साधला. दोन्ही बाकलीवाल बंधू फिडे मानांकित बुद्धिबळपटू असून, बुद्धिबळामुळे विकसित होणारी एकाग्रता, संयम, दूरदृष्टी आणि दबावाखाली निर्णय घेण्याची क्षमता विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीतही उपयुक्त ठरते, असा आयोजकांचा विश्वास आहे.

स्पर्धा संचालक व बाकलीवाल ट्युटोरियल्सचे संस्थापक वैभव बाकलीवाल म्हणाले, "या स्पर्धेच्या माध्यमातून युवा बुद्धिमत्तेला एकत्र आणता आल्याचा आनंद आहे. बुद्धिबळामुळे एकाग्रता वाढते आणि आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता विकसित होते. सर्व सहभागी खेळाडूंचे अभिनंदन आणि विजेत्यांना मनःपूर्वक शुभेच्छा." या स्पर्धेमुळे पुण्यातील विद्यार्थी व युवा बुद्धिबळपटूंना आपले कौशल्य दाखविण्यासाठी व्यासपीठ मिळाले. तसेच शिस्त, रणनीती, खिलाडूवृत्ती आणि निरोगी स्पर्धात्मकतेला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

## मातृत्व, माणुसकी आणि मानवता या मूल्यांनाही महत्त्व दिले पाहिजे

■ पुणे (दै. संध्या)

मातृत्वाची संकल्पना आता अधिकाधिक व्यापक होत चालली आहे. आपल्या समाजात एखाद्याचे नाव विचारल्यानंतर त्याच्या जातीविषयी उत्सुकता निर्माण होते. आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांसारख्या महापुरुषांचे नाव घेतो, त्यामुळे मातृत्व, माणुसकी आणि मानवता या मूल्यांनाही तितकेच महत्त्व दिले पाहिजे, असे मत विधानपरिषद सदस्य आमदार डॉ. नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केले.

जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटस् तर्फे विविध क्षेत्रातील दिग्गज व्यक्तिमत्त्वांना घडविण्यात मोलाचे योगदान देणाऱ्या भामाबाई शिंदे, ज्योती कदम, स्वाती निम्हण आणि सुनीता लांजेकर यांना आठव्या आदर्श माता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नऱ्हे येथील प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्त्या ममता सपकाळ, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर उपस्थित होते. साडी, श्रीफळ, पुणेरी पगडी, सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते. संस्थेच्या खजिनदार सुरेखा सुधाकरराव जाधवर



यांच्या वाढदिवसानिमित्त हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.

विधान परिषदेचे सभापती डॉ. राम शिंदे यांच्या मातोश्री भीमाबाई शिंदे, गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या मातोश्री ज्योती कदम, नगरसेवक सनी निम्हण यांच्या मातोश्री स्वाती निम्हण आणि सिने दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांच्या मातोश्री सुनीता लांजेकर यांचा या पुरस्काराने गौरव करण्यात आला.

डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या, जेव्हा एखादा पुरुष यशस्वी होतो, तेव्हा त्याच्या पाठीमागे एका स्त्रीचा त्याग आणि योगदान असते. मात्र, एखादी महिला यशस्वी होते, तेव्हा तिच्या पाठीशी संपूर्ण समाज उभा राहतो, तेव्हा तिला यशाची पायरी दिसते. या दोन्ही परिस्थितींमध्ये मोठा फरक आहे. स्त्रियांचे काम अनेकदा अदृश्य राहते, त्यामुळे त्यांच्या श्रमाचा वाटा आणि योगदान दुर्लक्षित होते. भारतमातेच्या संस्कृतीत मातेला जो सन्मान दिला जातो, तो अत्यंत महत्त्वाचा आहे.

ममता सपकाळ म्हणाल्या, आदर्श माता असल्याचे सिद्ध करण्याची कसोटी खूप मोठी असते. ज्यांना जन्म देता आणि ज्यांना घडवता, ते जोपर्यंत काळाच्या कसोटीवर उतरत नाहीत, तोपर्यंत आपण आदर्श माता म्हणून सिद्ध होत नाही. सर्वाधिक गृहीत धरले जाते ते आईला. घराला घरपण आईमुळेच मिळते. घर पुढे जात असते; मात्र या प्रवासात सर्वांत शेवटी उभी असते ती आई. आपला संस्कारांचा वसा आपण जपत असतो. आपण दिलेला हा वसा जेव्हा समाजाच्या उपयोगी ठरतो, तेव्हा तीच आईसाठी खरी कृतज्ञता असते.

ज्योती कदम म्हणाल्या, हा केवळ सन्मान नसून माझ्या मातृत्वाला मिळालेली प्रेमाची आणि कृतज्ञतेची पावती आहे.

## कारगिल, जम्मू, अयोध्या व राजस्थानसह सीमावर्ती भागात सैनिक करणार 'दगडूशेठ' गणपतीची प्रतिष्ठापना

■ पुणे (दै. संध्या)

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीची ख्याती केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर सर्वदूर पसरलेली आहे. त्यामुळे सामान्य नागरिकांप्रमाणेच देशाच्या सिमेवर लढणाऱ्या सैनिक गणेश भक्तांसाठी कारगिल, जम्मू, अयोध्या व राजस्थानसह सीमावर्ती भागात श्रीं च्या प्रतिकात्मक मूर्ती देण्यात आल्या. नुकत्याच या तुकड्यांच्या सैनिकांना या मूर्ती मंदिरात सुपूर्द करण्यात आल्या असून देशाच्या सीमावर्ती भागात रवाना झाल्या आहेत.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे भारतीय लष्करातील २४, ५, १९, १ मराठा लाइट इन्फन्ट्री युनिटच्या सैनिकांना मूर्ती देण्यात आल्या. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, राजाभाऊ चव्हाण, तुषार रायकर यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

भारतीय सैनिक सिमेवर अहोरात्र पहारा देत असल्याने त्यांना पुण्यामध्ये गणेशोत्सवात सहभागी होण्यास येता येतेच असे नाही. त्यामुळे यंदा देखील भारतीय लष्करातील मराठा लाइट इन्फन्ट्री युनिटचे सैनिक कारगिल, जम्मू,




अयोध्या आणि राजस्थानसह देशात विविध सीमावर्ती भागात गणेशोत्सवात श्रीं ची प्रतिकात्मक मूर्ती स्थापन करणार आहेत. सीमावर्ती भागात दगडूशेठ च्या श्रीं ची प्रतिकात्मक मूर्ती स्थापन करण्याची इच्छा या बटालियनच्या सैनिकांच्या वतीने व्यक्त करण्यात आली होती. ट्रस्टने सैनिकांच्या इच्छेला मान देऊन श्रीं ची हुबेहुब २ फुटी प्रतिकात्मक मूर्ती देण्याचे मान्य केले. त्यानुसार नुकत्याच या मूर्ती विविध ठिकाणी रवाना झाल्या आहेत. सलग १६ वर्षे हा उपक्रम सुरु असून बटालियनच्या संख्येत देखील वाढ होत आहे.

ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने म्हणाले, सन २०११ पासून मराठा बटालियन आणि दगडूशेठ गणपती ट्रस्टचे जवळचे संबंध आहेत. सिमेवरील भारतीय लष्करी ठाण्यामध्ये गणेशाची मूर्ती स्थापन केल्याने सैनिकांना वेगळी ऊर्जा मिळते.

## मान्सूनच्या शोधात : महाराष्ट्रातील ५ सुंदर धबधब्यांची सफर

पावसाची चाहूल लागताच निसर्गाने धारण केलेले सुंदर रुप अनुभवायचा मोह पर्यटकांना आवरत नाही. राज्यभरामधील विविध ठिकाणी असणारे धबधबे तर ओसंडून वाहू लागतात. पश्चिम घाटमाथ्यावर तर पावसाच्या हलक्या सरी बरसू लागल्या की, संपूर्ण भाग हिरवाईने बहरुन जातो. कडक उन्हाने तापलेले कडे, कोरड्या नद्यांना नवजीवन मिळाल्याचा जणू भास होतो. उंचावरुन कोसळणारे धबधबे, फेसळणाऱ्या पाण्याचा आवाज मनाला मंत्रमुग्ध करतो. पावसाळ्यामध्ये भटकंती करताना एखाद्या धबधब्याच्या शेजारी शांतपणे उभे राहून मनसोक्त भिजण्याची ओढ लागते. शहरांच्या गर्दीपासून दूर निसर्गरम्य वातावरणामध्ये धबधब्यांच्या सानिध्यात तुम्हाला वेळ घालवायचा असेल तर हाच काळ अगदी योग्य आहे.

ठोसेघर धबधबा सातारा जिल्ह्याला लाभलेली अद्भूत नैसर्गिक देणगी आहे. या धबधब्याच्या मोठ्या जलप्रवाहामध्ये अनेक छोटे मोठे धबधबे उंचावरुन खाली कोसळतात. सातारा शहरापासून अवघ्या २० किलोमीटर अंतरावर असलेले हे ठिकाण कोकण कड्यांनी वेढलेले आहे. घनदाट जंगलाच्या दरीत तब्बल २०० मीटर उंचीवरून ठोसेघर धबधबा खाली कोसळतो. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये इतर धबधब्यांवर न मिळणारी शांतता येथे अनुभवायला मिळते. याचठिकाणी एक व्ह्यू पॉईंटही बांधण्यात आला आहे. येथून निसर्गसंपन्नतेचा मनमुराद आनंद घेता येतो. घनदाट जंगल, सर्वदूर पसरलेली हिरवी चादर, धुक्यामध्ये हरवलेला परिसर आणि पावसाच्या हलक्या सरी



अनुभवताना मन आपसुकच शांत होते. निसर्गप्रेमी व शांततेमध्ये रमणाऱ्या पर्यटकांना कायम स्मरणात राहते.

कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्यातील दोनवडे परिसर हा सह्याद्रीतील निसर्गसंपन्न आणि तुलनेने कमी परिचित भाग आहे. पावसाळ्याची चाहूल लागताच येथील धबधबे ओसंडून वाहू लागतात आणि संपूर्ण परिसर हिरवाईने नटून जातो. दोनवडे–नितवडे परिसरातील खळाळणारे जलप्रवाह, धुक्याची चादर आणि शांत वातावरण पर्यटकांना निसर्गाच्या अधिक जवळ घेऊन जाते. सुट्टीच्या दिवसांत फिरण्यासाठी निवडल्या जाणाऱ्या इतर अनेक ठिकाणांच्या तुलनेत हा अनुभव अधिकच मनाला भिडणारा असतो.

सहस्त्रकुंड धबधब्याचा पर्यटन मार्गदर्शकांकडून फारसा उल्लेख केला जात नाही. मराठवाडा आणि विदर्भाच्या अगदी सीमेवर पैनगंगा नदीवर वसलेला हा धबधबा एक प्रसन्न अनुभव देणारा ठरतो. येथील जुन्या काळ्या खडकांवरून वाहणारे पाणी अनेक छोट्या-मोठ्या नैसर्गिक कुंडांमध्ये जमा होते. सहस्त्र म्हणजे हजार आणि कुंड म्हणजे पाण्याचे छोटे-मोठे साठे. यावरुन या धबधब्याला सहस्त्रकुंड म्हणून संबोधले जाते. या परिसरात सगळीकडे विविध प्रकारच्या रंगीबेरंगी फुलपाखरांचे दर्शन घडते. तसेच सहस्त्रकुंड धबधब्याच्या आजूबाजूच्या परिसरामध्ये राहण्यासाठी फार कमी प्रमाणात सोयी-सुविधा उपलब्ध आहेत. तुम्हीही या ठिकाणाला भेट देण्याचे नियोजन करत असाल तर जेवणाची पूर्वतयारी करणे अधिक सोयीस्कर ठरेल. धबधब्याच्या ठिकाणी असलेली शांतता आणि येथील निसर्गरम्य वातावरण पर्यटकांना वेगळ्याच विश्वात घेऊन जाते.

कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्यातील खेडगे गावाजवळील खेडगे–नितवडे धबधबा, ज्याला सावतकडा किंवा सातकडा धबधबा म्हणूनही ओळखले जाते, पावसाळ्यात याचे सौंदर्य विशेष खुलून येते. उंच कड्यावरून वेगाने कोसळणारा जलप्रवाह, सभोवतालची दाट वनराई आणि धुक्याने वेढलेला परिसर पर्यटकांना मंत्रमुग्ध करतो. पावसाळ्यात येथील निसर्गसौंदर्य अधिक खुलून दिसत असल्याने निसर्गप्रेमी आणि छायाचित्रणाची आवड असलेल्या पर्यटकांसाठी हे ठिकाण विशेष आकर्षण ठरते.

महाराष्ट्रातील सर्वात उंच धबधबा म्हणून ओळखला जाणारा वजराई धबधबा सहजासहजी गाठता येत नाही आणि त्याचे हेच वैशिष्ट्य आहे. सातारा जिल्ह्यातील चाळकेवाडीजवळ वसलेला हा धबधबा सुमारे ५६० मीटर उंचीवरून अनेक टप्प्यांत खाली कोसळतो. जुलै महिन्यामध्ये वजराई धबधबा आणि त्याचा आजूबाजूचा परिसर निसर्गाचे विलोभनीय दर्शन घडवतो. एका बाजूला ढगांमध्ये हरवलेल्या पवनचक्क्या, ओल्या मातीत उमलणारी रानफुले आणि दुसऱ्या बाजूला दूरवरून ऐकू येणारा धबधब्याचा प्रचंड गडगडाट, हे दृश्य अविस्मरणीय ठरते. नियोजनपूर्वक प्रवास करणाऱ्या आणि निसर्गाचा अनुभव मनापासून घेऊ इच्छिणाऱ्या पर्यटकांसाठी वजराई धबधबा हे आदर्श ठिकाण आहे.

जाण्यापूर्वी हे लक्षात ठेवा

पावसाळ्यातील धबधबे जितके सुंदर दिसतात, तितकेच ते अनिश्चित आणि धोकादायकही असू शकतात. पावसामुळे पायवाटा घसरड्या होणे, पाण्याची पातळी अचानक वाढणे किंवा हवामानात क्षणार्धात बदल होणे अशा परिस्थिती निर्माण होऊ शकतात. त्यामुळे मजबूत बूट, हलका रेनकोट आणि आवश्यक साहित्य सोबत ठेवावे.

वाट धोकादायक वाटल्यास पुढे जाण्याचा हट्ट करू नये. धबधब्याच्या कड्याच्या अगदी जवळ जाणे, जोरदार जलप्रवाहाखाली उभे राहणे किंवा पाण्याने भरलेल्या ओढे व कुंडांमध्ये पोहण्याचा प्रयत्न करणे टाळावे. महाराष्ट्रातील पावसाळा हा केवळ एक ऋतू नसून निसर्गाचा एक अविस्मरणीय अनुभव आहे. या अनुभवाचा आनंद घेताना सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य द्या आणि निसर्गाचा आदर राखत प्रवास करा.

## थोडक्यात पण महत्वाचे



### जेजुरीत गणेशमूर्तींवर रंग कलेसाठी मूर्तीकारांची लगबग

**जेजुरी : दैनिक संध्या**

सार्वजनिक गणेशोत्सव जवळ आला असून या निमित्ताने जेजुरी येथील कुंभारवाड्यात श्री गणेशाच्या मूर्तींना रंग कलेचा शेवटचा हात देण्यासाठी मूर्तीकारांची लगबग सुरू झाली आहे. महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीत व पंचक्रोशीत गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. जेजुरी शहर व पंचक्रोशीत घरोघरी व सार्वजनिक असे पाच हजार हून अधिक गणेश मूर्तींची जेजुरीत विक्री होत असते. जेजुरी येथील मूर्तिकार तुषार कुंभार,सचिन कुंभार व त्यांचा परिवारातील यश,शौर्य,प्रेरणा, शुभ्रा व महिला गेली चार पिढ्यांपासून श्री गणेशाच्या मूर्ती तयार करून त्याची विक्री करीत आहेत. गणेशोत्सव जवळ आल्याने या परिवाराने तयार केलेल्या दीड हजार मूर्तींवर रंगाचा शेवटचा हात देण्यासाठी लगबग सुरू आहे. या कुंभार परिवाराने सहा इंचा पासून ते आठ फूट पर्यंतच्या पर्यावरण पूरक गणेश मूर्ती तयार केल्या असून अगदी पाचशे रुपया पासून मूर्ती उपलब्ध करण्यात आली आहे. याही वर्षी मूर्ती तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्चा मालाच्या किमती व रंग तसेच सजावटीच्या वस्तूत वाढ झाल्याने मूर्तींचे दर ही 10 टक्क्यांनी वाढणार असल्याचे युवा मूर्तिकार यश व शौर्य कुंभार यांनी सांगितले. यावर्षी दगडूशेठ हलवाई व लालबाग गणेश मूर्ती तसेच मूर्तींना दागिने,फेटा रंगीत वस्त्रे अशी सजावट केलेल्या मूर्तींना मोठी मागणी आहे.आत्ता पर्यंत 50 टक्के मूर्ती बुक झाल्याचे तुषार कुंभार यांनी सांगितले.

### मोटोव्हर्स २०२६ चे काउंटडाउन सुरू, पहिल्या टप्प्याचे नेतृत्व करणाऱ्या कलाकारांची घोषणा

**पुणे : दैनिक संध्या**

सर्वात मोठा मोटो-कल्चर उत्सव 'मोटोव्हर्स २०२६'साठी सज्ज होत रॉयल एनफिल्डने आज भारतातील काही सर्वात वैशिष्ट्यपूर्ण गायक आणि कलाकारांचा समावेश असलेल्या पहिल्या टप्प्यातील कलाकारांच्या नावांची घोषणा केली आहे. रॉयल एनफिल्डच्या ऐतिहासिक १२५व्या वर्षाच्या पार्श्वभूमीवर मोटोव्हर्स २०२६ अंतर्गत २७ ते २९ नोव्हेंबर दरम्यान तीन दिवस वागातोर, गोवा येथे संगीत, मोटरसायकल्स, कला, खेळ आणि संस्कृती अनुभवता येणार आहे. या फेस्टिव्हलचे आतापर्यंतचे सर्वात मोठे एडिशन ठरणाऱ्या मोटोव्हर्स २०२६ मध्ये विशेष मोटरसायकल्सचे अनावरण आणि लाँच, प्युअर स्पोर्ट्स अनुभव, कला व कारागिरी, क्युरेटेड राईड्स, फूड, वर्कशॉप्स आणि अनेक समुदाय अनुभव सादर केले जातील. मेन स्टेजचे प्रमुख आकर्षण ठरणाऱ्या कलाकारांमध्ये रेबल, लिफाफा, फरहान अख्तर, संजित हेगडे, एमएचआर अँड फ्रेंड्स आणि द थिंक फ्लॉयडियन यांचा समावेश आहे, जो हिप-हॉप, हिंदी-भाषिक इलेक्ट्रॉनिका, प्लेबॅक आणि ट्रिब्यूट परफॉर्मन्सचा एक अनोखा मेळ आहे. रेबल भारताच्या स्वतंत्र हिप-हॉप जगतातील ऊर्जा घेऊन येत आहे, जी आता राष्ट्रीय चित्रपटांच्या साउंडट्रॅकपर्यंत पोहोचली आहे. फरहान अख्तर रूपेरी पडदा आणि रंगमंच दोन्ही सहजपणे गाजवत आहेत. संजित हेगडे बहुभाषिक प्लेबॅक संगीताचा संग्रह घेऊन येत आहेत आणि लिफाफा हिंदी-भाषिक इलेक्ट्रॉनिका संगीतच्या कक्षा विस्तारणे सुरूच ठेवत आहे. स्टेजची सांगता करताना, एमएचआर अँड फ्रेंड्स रॅप, मेलडी आणि प्रायोगिक प्रॉडक्शनचा एक अनोखा संच सादर करत आहेत, तर द थिंक फ्लॉयडियन पिंक फ्लॉयडचा वातावरणीय आणि तल्लीन करणारा लाईव्ह आवाज पुन्हा निर्माण करत स्वतःचा एक सायकेडेलिक सेट सादर करत आहेत. हे सर्व कलाकार एकत्र येऊन मोटोव्हर्सची ओळख बनलेली विविधता आणि व्यापकता दर्शवतात. हीच भावना कम्युनिटी स्टेजवरही पाहायला मिळते, जी भारतातील स्वतंत्र आणि उदयोन्मुख संगीत क्षेत्रावर प्रकाश टाकते. गायक-गीतकार रुशिल आणि माली आपुलकीचा आणि भावुक स्पर्श घेऊन येतात, सुग्गाहनी एक प्रखर हिप-हॉप आवाज जोडतो, तर कर्टन ब्लू, कोमोरेबी अँड गोया, ओजी शेझ आणि अक्सोमॅनियाक स्वतंत्र, इलेक्ट्रॉनिक आणि प्रादेशिक आरअँडबी संगीताच्या मिश्रणासह या मंचाची सांगता करतात. दोन्ही मंचांवर, हा कलाकार संच मोटोव्हर्सच्या स्वतंत्र आणि उत्साही भावनेशी जोडलेल्या कलाकारांचा गौरव करतो, असे निर्माते जे सतत नवीन मार्ग, आवाज आणि शक्यतांचा शोध घेत असतात. फेस्टिव्हलच्या दिशेने वाटचाल करताना आणखी काही नावांची घोषणा केली जाईल. प्युअर स्पोर्ट्स अरेनामध्ये रायडर्स व उत्साही डर्ट ट्रॅक, मोटो पोलो, मौत का कुआँ, स्लाईड स्कूल, ड्रिफ्ट स्कूल आणि ट्रेल स्कूलच्या माध्यमातून आपल्या कौशल्याची परीक्षा घेऊ शकतात. मोटोव्हिल रॉयल एनफिल्डच्या जागतिक सर्जनशील चळवळीतील सर्जनशीलता आणि कारागिरीचा उत्सव साजरा करेल, तर मोटोरील वर्कशॉप्स, संवाद आणि कथांच्या माध्यमातून रायडर्स, साहसी, रेसर्स, कस्टम बिल्डर्स आणि एक्स्प्लोरर्सना एकत्र आणेल.

### काळदरी विद्यालयात विद्यार्थ्यांनी घेतला 'पुस्तकहंडी' फोडण्याचा आनंद

**काळदरी : दैनिक संध्या**



येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित श्री केदारेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, काळदरी या विद्यालयात नुकताच वाचन संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी आगळावेगळा उपक्रम म्हणून 'पुस्तकहंडी' कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सांस्कृतिक विभाग प्रमुख बाळू पोमणे व ग्रंथालय विभाग प्रमुख संजय भिंताडे यांच्या उपस्थितीत शाळेच्या मैदानावर गोकुळाष्टमीचे औचित्य साधत ही पुस्तकहंडी उभारण्यात आली होती. हंडीत दही-लोण्याऐवजी विविध उत्तम बालसाहित्य, गोष्टींची पुस्तके, चरित्रग्रंथ आणि कवितासंग्रह आकर्षक पद्धतीने बांधण्यात आले होते. याप्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य पांडुरंग दुर्गाडे म्हणाले की, "पुस्तके हेच खरे माणसाचे उत्तम मित्र आहेत. नियमित वाचनाने नवीन शब्द समजतात. बोलण्यात आणि लिहिण्यात भाषेची शुद्धता आणि स्पष्टता येते. वाचनामुळे इतिहास, विज्ञान, साहित्य आणि इतर विषयांची नवीन माहिती मिळते. आपली जगाकडे पाहण्याची दृष्टी व्यापक होते. पुस्तक वाचल्याने मनाला शांतता मिळते. कामाचा किंवा दिवसाचा ताण कमी होऊन मन हलके होते. वाचनामुळे मेंदूचे कार्य सुधारते. दीर्घ मजकूर वाचल्यामुळे डिजिटल युगात कमी झालेली एकाग्रता पुन्हा वाढण्यास मदत होते. वाचनामुळे माणसाचा बौद्धिक, मानसिक आणि भावनिक विकास होतो." यावेळी प्रथमतः स्व चंदुकाका जगताप व श्री सत्य साई बाबा यांच्या प्रतिमांचे व पुस्तकहंडीचे पूजन प्रमुख पाहुणे नरेश हिराणी साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आले. नंतर सर्व विद्यार्थ्यांनी फेर धरीत "गोविंदा आला रे आला, बोल बजरंग बली की जय, गोविंदा रे गोपाला" यांसारख्या गीतांवर नृत्य केले. प्रथम इयत्ता पाचवीतील विद्यार्थ्यांनी पुस्तक हंडीला मानवंदना दिली तर इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना विद्यार्थीनींनी हि पुस्तकहंडी फोडण्यासाठी प्रयत्न केला. शेवटी मानवी साखळी तयार करुन तीन थर लावून अत्यंत शिस्तीत व आनंदाने ही पुस्तकहंडी फोडली. हंडी फुटताच खाली पडलेली पुस्तके विद्यार्थ्यांनी आनंदाने गोळा केली. या आगळ्यावेगळ्या उपक्रमामुळे मुलांमध्ये वाचनाची गोडी निर्माण झाली असून, सर्वत्र आनंद पसरला होता.

# संचमान्यतेचा फेरआढावा घेण्याची जोरदार मागणी

■ पुणे (दै. संध्या)

उच्च माध्यमिक स्तरावरील प्रस्तावित अन्यायकारक संचमान्यता धोरणाविरोधात श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर आणि महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघ यांच्या वतीने गुरुवार, दिनांक 4 सप्टेंबर रोजी शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन व जोरदार निदर्शने करण्यात आली. शासनाच्या प्रस्तावित संचमान्यता मसुद्याचा यावेळी तीव्र निषेध करून प्रचलित निकषांनुसार संचमान्यता करण्याची मागणी करण्यात आली.

शिक्षकांच्या सेवासुरक्षेसोबतच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित आणि संस्थांच्या प्रत्यक्ष गरजा विचारात घेऊन शासनाने प्रस्तावित संचमान्यता धोरणात तातडीने सुधारणा करावी, राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयांच्या संचमान्यतेसंदर्भात शिक्षण संचालनालयाने शासनाकडे सादर केलेला प्रस्तावित मसुदा अन्यायकारक असून त्याची अंमलबजावणी झाल्यास राज्यातील सुमारे ८ ते १० हजार शिक्षक अतिरिक्त होण्याची शक्यता आहे. तसेच अनेक पूर्णवेळ शिक्षक अर्धवेळ होण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे शिक्षकांची सेवासुरक्षा आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आणणारे संचमान्यतेचे निकष तातडीने रद्द करावेत, अशी जोरदार मागणी शिक्षक मित्र कौस्तुभ गावडे यांनी केली.

प्रस्तावित मसुद्यामध्ये ४५ मिनिटांची तासिका ४० मिनिटांची करण्याचा निकष सुचविण्यात आला आहे. त्यामुळे उपलब्ध तासिकांच्या गणनेत मोठा बदल होऊन शिक्षकांची पदे अतिरिक्त ठरण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर विज्ञान शाखेतील एका बॅचची विद्यार्थीसंख्या २० वरून ३० करण्याचा प्रस्ताव असून, त्याचा थेट परिणाम विज्ञान शाखेतील शिक्षकांच्या पदांवर होणार असल्याचे कौस्तुभ गावडे यांनी स्पष्ट केले.

यावेळी संघटनेचे संजय शिंदे, अविनाश बोर्डे, लक्ष्मण रोडे, रविंद्र भदाणे, रवींद्र पाटील, प्रा शिवराम सूर्यवंशी, प्रा डॉ अशोक गव्हाणकर, प्रा दिलीप शितोळे, प्रा मुकुंद आंधळकर, प्रा संतोष फाजगे यांनी मनोगते व्यक्त केली. वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्नित कनिष्ठ महाविद्यालयातील कला व वाणिज्य शाखांसाठी १२० विद्यार्थीसंख्येचा निकष प्रस्तावित करण्यात आला आहे.

या निकषामुळे अनेक तुकड्या अनुदानासाठी अपात्र ठरण्याची शक्यता असून, कार्यरत शिक्षकांच्या सेवासुरक्षेचा प्रश्न गंभीर होणार असल्याचे आंदोलनकर्त्यांनी निदर्शनास आणून दिले. उच्च माध्यमिक स्तरावरील ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतील तांत्रिक अडचणी आणि विलंबामुळे ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहत आहेत. प्रवेश प्रक्रियेला होणारा विलंब आणि विविध तांत्रिक अडचणी यामुळे काही विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमांकडे वळतात. परिणामी कनिष्ठ महाविद्यालयांमधील विद्यार्थीसंख्या कमी होऊन शिक्षकांची पदे अतिरिक्त ठरण्याची परिस्थिती निर्माण होत असल्याचा मुद्दाही आंदोलनकर्त्यांनी मांडला.



या आंदोलनादरम्यान अन्यायकारक संचमान्यता तातडीने रद्द करावी, प्रस्तावित निकषांचा वस्तुनिष्ठ फेरआढावा घ्यावा, कार्यरत शिक्षकांवर कोणताही अन्याय होणार नाही याची दक्षता घ्यावी, तसेच प्रचलित निकषांनुसार पारदर्शक ऑनलाईन संचमान्यता प्रक्रिया राबवावी, अशा मागण्या करण्यात आल्या.

मागण्यांवर सकारात्मक निर्णय न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

या आंदोलनास विविध शिक्षक संघटनांनी पाठिंबा दिला.

याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक महासंघाचे सहसचिव श्री. दिलीप शितोळे, कोल्हापूर जिल्हा शिक्षक संघाचे अध्यक्ष आण्णासाहेब बागडी, सातारा शिक्षक संघाचे उपाध्यक्ष सुनील शिंदे, सांगली जिल्हा शिक्षक संघाचे अध्यक्ष सुरेश भिसे, अभिजीत दुर्गी यांच्यासह महाराष्ट्रातून हजारो शिक्षक बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शासनाचा पगार व धर्मांतराचा अड्डा; फसवणूक करणाऱ्या मुख्य सूत्रधाराला अटक कधी करणार? - हिंदू संघटनांचा सवाल

■ पुणे (दै. संध्या)

बापूजीनगर येथील म्हाडा संकुलातील समाजमंदिरात गेली २५ वर्षे राजरोसपणे सुरू असलेल्या बेकायदेशीर चर्चवर सोलापूर महानगरपालिका प्रशासनाने अखेर सील ठोकले आहे. हिंदु जनजागृती समितीसह समस्त हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी या धडक कारवाईचे स्वागत केले आहे; मात्र केवळ वास्तू सील करून हा विषय संपत नसून, हिंदू आरक्षणाचा लाभ घेऊन राज्य शासनाची घोर फसवणूक करणारा आणि या धर्मांतर रॅकेटचा मुख्य सूत्रधार ख्रिश्चन पास्टर दत्तात्रय कानेपागूल उर्फ येहान मार्क याला बेड्या कधी ठोकणार, असा खडा सवाल हिंदु संघटनांनी प्रशासनाला विचारला आहे. आज सोलापुरात आयोजित करण्यात आलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत ही संतप्त मागणी करण्यात आली.

सोलापूर येथे झालेल्या पत्रकार परिषदेतला श्री. रवी गोणे (शहर अध्यक्ष, हिंदु राष्ट्र सेना), श्री. आनंद मुसळे (शहर संघटक, हिंदु राष्ट्र सेना), श्री. प्रकाश आसादे (हिंदु राष्ट्र सेना), श्री. राजन बुणगे (सोलापूर जिल्हा समन्वयक, हिंदु जनजागृती समिती), कु. वर्षा जेवळे (सोलापूर, हिंदु जनजागृती समिती) आणि अधिवक्ता चंद्रशेखर वारद (राष्ट्रभक्त अधिवक्ता समिती) हे उपस्थित होते. दत्तात्रय कानेपागूल हा सोलापूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात कारकून म्हणून कार्यरत आहे. त्याने 'हिंदू मोची' या जातीच्या आरक्षणाचा लाभ घेऊन शासकीय नोकरी लाटली. मात्र, प्रत्यक्षात ख्रिश्चन धर्म स्वीकारून तो 'येहान मार्क' या नावाने 'जिजस गॉस्पल सोसायटी' या चर्चचा पास्टर म्हणून धर्मांतराचे उद्योग चालवत आहे. हा प्रकार म्हणजे केवळ राज्य शासनाचीच नव्हे, तर खऱ्या मागासवर्गीयांच्या हक्कांची घोर फसवणूक आहे.

त्यामुळे या बोगस कर्मचाऱ्याला तात्काळ सेवेतून कायमचे बडतर्फ करावे; तसेच त्याने आतापर्यंत लाटलेला पगार आणि सर्व शासकीय सवलती त्याच्याकडून चक्रवाढ व्याजासह वसूल कराव्यात, अशी भूमिका संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी मांडली. कारवाईची कुणकुण लागताच या मंडळींनी प्रशासनाची दिशाभूल करण्यासाठी रातोरात चर्चवरील क्रॉस काढून पुरावा नष्ट करण्याचा दांभिक प्रकार केला आहे.

## मनविसेची आक्रमक भूमिका: शैक्षणिक वर्ष उलटले तरी क्रीडा स्पर्धांचे वेळापत्रक नाही

■ पुणे (दै. संध्या)

शैक्षणिक वर्ष सुरू होऊन मोठा कालावधी उलटला तरी पुणे महानगरपालिकेच्या क्रीडा विभागाकडून शालेय क्रीडा स्पर्धांचे अधिकृत वेळापत्रक जाहीर न झाल्याने हजारो खेळाडूंचे भवितव्य टांगणीला लागले आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेने (मनविसे) आक्रमक भूमिका घेतली असून, वेळापत्रक तात्काळ जाहीर न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा मनपा आयुक्त आणि क्रीडा अधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

दरवर्षी जुलैच्या पहिल्या आठवड्यात तालुका, जिल्हा व विभाग स्तरावरील विविध खेळांच्या स्पर्धांचे आयोजन केले जाते. मात्र, यंदा ऑगस्ट महिना संपला तरी क्रीडा विभागाने कोणतेही नियोजन केलेले नाही. दरवर्षीप्रमाणे निधीचा अभाव, प्रशासकीय समन्वयाची कमतरता किंवा तांत्रिक कारणे पुढे करून टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप 'मनविसे' वडगाव शेरी विभागाच्या वतीने करण्यात आला आहे.

वेळेत स्पर्धा न झाल्यास विद्यार्थ्यांना राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांपासून वंचित राहावे लागेल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. वेळापत्रक त्वरित जाहीर करा: शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील सर्व शालेय क्रीडा स्पर्धांचे अधिकृत वेळापत्रक तात्काळ प्रसिद्ध करण्यात यावे. प्रशासकीय अडचणी दूर करा: निधी आणि इतर तांत्रिक प्रश्न प्राधान्याने सोडवून सर्व स्पर्धा नियोजित वेळेत पार पाडाव्यात.

## शिक्षक दिनी शिक्षणमंत्र्यांच्या निवासस्थानासमोर शिक्षक दिनी भारतीय मजदूर संघाचे धरणे आंदोलन

■ पुणे (दै. संध्या)

सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी, पुणे अंतर्गत विविध कॅम्पसमध्ये कार्यरत असलेल्या हजारो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे तब्बल 20 महिन्यांहून अधिक काळाचे वेतन प्रलंबित असल्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. कर्मचाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, या दीर्घकालीन आर्थिक संकटामुळे अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली असून आतापर्यंत 13 कर्मचाऱ्यांनी आपले जीवन संपवल्याचा गंभीर आरोप भारतीय मजदूर संघाने पत्रकार भवन येथील पत्रकार परिषदेत केला आहे.

या वेळेस भारतीय मजदूर संघ संघटन सचिव बाळासाहेब भुजबळ, पुणे जिल्हाध्यक्ष अर्जुन चव्हाण, सचिव सागर पवार, उमेश विश्वाद व सिंहगड टेक्निकल एज्युकेशन अनिकेत जाधव, औदुंबर साठे, सर्जेराव जाधव, शैलेश जाधव व.श्रीमती जाधव व इतर विविध कामगार प्रतिनिधि उपस्थित होते.

या गंभीर परिस्थितीकडे शासन व संबंधित यंत्रणा डोळेझाक करत असल्याचा आरोप करत भारतीय मजदूर संघाने तीव्र संताप व्यक्त केला आहे. गेल्या दोन महिन्यांहून अधिक काळ कर्मचारी आपल्या थकीत वेतन, पीएफ, न्याय्य हक्कांसाठी आंदोलन व संप करीत आहेत. मात्र वारंवार निवेदने, आंदोलने आणि मागण्या करूनही शासन स्तरावर ठोस निर्णय झालेला नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. कर्मचाऱ्यांसमोर वेतन नाही, पी.एफ. संदर्भातील प्रश्न प्रलंबित आहेत, सातव्या वेतन आयोगाचा पूर्ण लाभ नाही—मग कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा? असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. कर्मचाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, सन 2016 पासून भविष्य निर्वाह निधी (पी.एफ.) संदर्भात गंभीर अनियमितता असून कर्मचाऱ्यांच्या हक्काच्या रकमेबाबत अद्याप समाधानकारक कार्यवाही झालेली नाही.

## 'फिल्मफेअर अवॉर्ड्स मराठी २०२६' सोनी मराठीवर

■ पुणे (दै. संध्या)

मराठी चित्रपटसृष्टीतील प्रतिभा, लोकप्रियता आणि योगदानाचा गौरव करणारा बहुप्रतिक्षित 'फिल्मफेअर अवॉर्ड्स मराठी २०२६' आता प्रेक्षकांना घरबसल्या आपल्या टीव्ही वरती सोनी मराठी वाहिनीवर अनुभवता येणार आहे. मराठी मनोरंजनविश्वातील कलाकार, दिग्दर्शक, संगीतकार आणि तंत्रज्ञ यांच्या उल्लेखनीय कामगिरीचा सन्मान करणारी ही खास रात्र ग्लॅमर, मनोरंजन आणि भावनांनी रंगणार आहे. या पुरस्कार सोहळ्याचे सूत्रसंचालन सिद्धार्थ चांदेकर आणि अमेय वाघ करणार असून, दोघांच्या धमाल अंदाजामुळे आणि खुमासदार संवादामुळे प्रेक्षकांना मनोरंजनाची भरपूर मेजवानी मिळणार आहे. त्यांच्या विनोदी शैलीसोबतच दोघांची ऑन-स्क्रीन




केमिस्ट्री या सोहळ्याचा विशेष आकर्षणबिंदू ठरणार आहे. मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक लोकप्रिय कलाकार आणि दिग्गज एकाच मंचावर उपस्थित राहणार असल्याने ही रात्र खास ठरणार आहे.

# गोपाल कृष्ण... च्या जयघोषात इस्कॉन मध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सव साजरा

■ पुणे (दै. संध्या)

श्री गोपाळ कृष्ण भगवान की जय... हरे रामा हरे कृष्णा... राधे कृष्ण गोपाल कृष्ण...च्या जयघोषात कात्रज-कोंढवा रस्ता आणि कॅम्प येथील इस्कॉन मंदिरात श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्यानिमित्त राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, आमदार भीमराव तापकीर, योगेश टिळेकर, अभिनेते राहुल सोलापूरकर, अनेक नगरसेवक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी भगवंतांचे दर्शन घेतले. तब्बल तीन लाख भाविकांनी राधाकृष्णाचे दर्शन घेतले, तर १० हजार निवडक भक्तांनी भगवान श्रीकृष्णाचा अभिषेक केला. आलेल्या भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

भगवान कृष्णांचे द्वारका-जगन्नाथ पुरी ते वृंदावन प्रस्थान रथयात्रेतून होते. म्हणजेच भगवंतांचा ऐश्वर्य भाव ते वैयक्तिक भक्तांशी असलेले प्रेमसंबंध रथयात्रा प्रदर्शित करते. यावर आधारित गीत गोविंद वेष, पद्म वेष, सोनार वेष, वन भोजन वेष, नागार्जुन वेष आणि गज वेष आदी लीलांचे अतिशय आकर्षक आणि सुंदर देखावे अभिषेकाच्या ठिकाणी करण्यात आले होते.

संस्थापक आचार्य श्रील प्रभुपाद यांनी स्थापित केलेल्या आंतरराष्ट्रीय कृष्ण भावनामृत संघाच्या (इस्कॉन) मंदिरात रत्नजडित वस्त्रालंकारांनी सजलेल्या राधाकृष्णाचे रूप पाहण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती. फुलांनी सजविलेल्या पाळण्यातील बालकृष्णाला पाळणा देत भाविकांनी जन्माष्टमी उत्सव साजरा केला. मंदिराचे अध्यक्ष राधेश्याम प्रभू, रेवतीपती प्रभू, जयदेव प्रभू या मंदिराच्या वरिष्ठ भक्त मंडळींसह विविध क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते.



भगवंतांना हरे-कृष्ण महामंत्राच्या जयघोषात मंदिरातील भक्तवृंदातर्फे महाअभिषेक करण्यात आला. त्यानंतर भगवंतांना ५६ प्रकारचे नैवेद्य २५१ ताटांमधून दाखवून बरोबर रात्री १२ वाजता आरती करण्यात आली, अशी माहिती प्रवक्ते जनार्दन चितोडे यांनी दिली. उपाध्यक्ष संजय भोसले यांनी जन्माष्टमी महोत्सवाचे आध्यात्मिक तसेच सांस्कृतिक महत्त्व आणि इस्कॉन संस्थेच्या जगभरातील उपक्रमांबद्दल सांगितले. विशेष अतिथी कक्षातर्फे संपर्क प्रमुख अनंतगोप प्रभू आणि प्रसाद कारखानीस यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. मंदिरामध्ये जन्माष्टमीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या 'कृष्णसमर्पण' सांस्कृतिक महोत्सवाचा समारोप झाला. महोत्सवात देशभरातून ७०० कलावंतांनी शास्त्रीय नृत्य, गायन, नाट्य, वादन करून त्यांची कला भगवंतांना समर्पित केली. श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त मंदिरातील तिन्ही गाभाऱ्यातील श्री श्री राधा-वृंदावन चंद्र, जगन्नाथ-बलदेव-सुभद्रा आणि गौर-निताई यांच्या विग्रहांना आकर्षक वस्त्र-आभूषणांनी सजविण्यात आले होते. यावर्षी खास राजस्थानी शैलीची वेशभूषा करण्यात आली होती. याच मंदिराच्या आवारात श्री बालाजीचे सुंदर मंदिर असून, या सर्व मंदिरांवर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती.